रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ९
www.ramprahar.com
◆ रविवार, २६ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## देशातील १८ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा



**नवी दिल्ली :** देशभरात मान्सूनचा जोर दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालला असून भारतीय हवामान विभागाने देशातील हवामानाबाबत एक अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर इशारा जारी केला आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार आगामी १२ तासांत देशातील तब्बल १८ राज्यांना वादळी आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. उत्तर भारतापासून ते पूर्व आणि मध्य भारतापर्यंत अनेक भागांत हवामान अतिशय खराब राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही प्रमुख भागांमध्ये सोसाट्याचा वारा ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वाहू शकतो, ज्यामुळे नागरिकांना विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. खराब हवामानामुळे डोंगराळ राज्यांमध्ये भूस्खलन आणि अचानक पूर येण्याचा मोठा धोका कायम आहे.

## अंतरंग

नेरळजवळ मालगाडीचे १६ डबे झाले वेगळे/२
मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त मुरूडमध्ये नेत्रतपासणी/५
नववर्षात क्रिकेट चाहत्यांसाठी आनंदाची पर्वणी/८

# बळीराजाला सुखी-समाधानी ठेव!

## मुख्यमंत्र्यांचे विठूरायाला साकडे

**पंढरपूर : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा सोहळा शनिवारी (दि. २५) पहाटे भक्तिमय वातावरणात व उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते पहाटे अडीच वाजता श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. यावेळी विठूरायाला सगळे मागणे माहीत असते. दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या बळीराजाला सुखी-समाधानी ठेव; महाराष्ट्रात चांगला पाऊस पडू दे, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठलाकडे घातले.



महापूजेनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "बा विठ्ठला, राज्यातील प्रत्येक शेतकरी सुखी राहू दे. महाराष्ट्रभर समाधानकारक पाऊस पडू दे आणि सर्वांच्या जीवनात समृद्धी नांदो, अशी प्रार्थना आज विठूरायाच्या चरणी केली आहे." यंदाच्या महापूजेसाठी मानाचे वारकरी म्हणून धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील शेतकरी दाम्पत्य बाळासाहेब माधव माने आणि प्रभावती बाळासाहेब माने यांची निवड झाली. ७० वर्षीय बाळासाहेब माने गेल्या २० वर्षांपासून आळंदी ते पंढरपूर अशी पायी वारी करीत असून यंदा त्यांनी पत्नीसह विठूरायाच्या दर्शनासाठी वारी पूर्ण केली.

आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी दुपारीच पंढरपुरात दाखल झाले होते. शनिवारी पहाटे दोनच्या सुमारास ते पत्नी अमृता फडणवीस आणि कुटुंबीयांसह श्री विठ्ठल मंदिरात पोहचले. पहाटे अडीच वाजता विठ्ठलाची शासकीय महापूजा पार पडली. त्यानंतर श्री रुक्मिणी मातेसही विधिवत महापूजा अर्पण करण्यात आली. विशेष म्हणजे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांना आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान यंदा सलग सहाव्यांदा मिळाला आहे.

# विठ्ठलनामाच्या जयघोषात रायगड जिल्हा दुमदुमला!

## दिंड्यांचा उत्साह, भजन-कीर्तनाने भक्तिमय वातावरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

विठ्ठल...विठ्ठल... जय हरी विठ्ठल..., ज्ञानोबा-तुकाराम...च्या नामघोषाने शनिवारी (दि. २५) पहाटेपासूनच रायगड जिल्ह्यातील वातावरण भक्तिरसाने भारावून गेले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने जिल्ह्यातील लहान-मोठ्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. गावागावांतून निघालेल्या दिंड्या, टाळ-मृदंगाचा गजर, हरिपाठ, अभंगगायन आणि भजन-कीर्तनामुळे संपूर्ण जिल्हा जणू विठ्ठलमय झाला होता.



पहाटेच्या मंगल आरतीने आणि श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या विधिवत महापूजेने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. पुरोहितांच्या हस्ते अभिषेक, पूजाअर्चा पार पडताच मंदिरांचे दरवाजे भाविकांसाठी खुले करण्यात आले. त्यानंतर दिवसभर दर्शनासाठी मंदिरांबाहेर भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

अलिबागजवळील वरसोली येथील प्राचीन आंग्रेकालीन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर हे यंदाही भक्तांचे प्रमुख आकर्षण ठरले. अलिबाग तालुक्यातील विविध गावांतील आणि कोळीवाड्यांतील दिंड्या टाळ-मृदंगाच्या गजरात मंदिरात दाखल झाल्या. विठ्ठल... विठ्ठलच्या अखंड नामस्मरणात भाविकांनी विठूरायाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात विविध भजन मंडळांनी दिवसभर अभंग, हरिपाठ आणि भजन सेवा सादर केली. भक्तिरसाने न्हाहलेल्या या वातावरणामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळत होती.

मंदिर विश्वस्त आणि संयोजन समितीने भाविकांच्या सुविधेसाठी विशेष नियोजन केले होते. दर्शनासाठी स्वतंत्र रांग व्यवस्था, पावसापासून संरक्षणासाठी तात्पुरते शेड, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे हजारो भाविकांना कोणतीही गैरसोय न होता दर्शन घेता आले. खालापूर तालुक्यातील साजगाव येथील श्री विठ्ठल मंदिर, ज्याला प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते, येथेही भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या वारकऱ्यांनी भक्तिभावाने विठ्ठलाचे दर्शन घेतले. अनेक ठिकाणी हरिनाम सप्ताह, कीर्तन, प्रवचन, भजन स्पर्धा आणि सामुदायिक हरिपाठाचे आयोजन करण्यात आले होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने अनेक शाळांमधून विद्यार्थ्यांच्या पारंपरिक दिंड्याही काढण्यात आल्या. टाळ, चिपळ्या, भगव्या पताका, तुळशीच्या वृंदावनाच्या प्रतिकृती आणि संतांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमुळे गावागावांत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. अनेक ठिकाणी रिंगण करून विठूरायाच्या भजनात दंग झालेले बाल वारकरी सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते.

मंदिर परिसरात तुळशीच्या माळा, विठ्ठलाच्या प्रतिमा, धार्मिक पुस्तके आणि प्रसाद विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचीही मोठी गर्दी दिसून आली. भाविकांनी तुळशीच्या माळा, नारळ, फुले अर्पण करून विठूरायाच्या चरणी नतमस्तक होत सुख, समृद्धी आणि चांगल्या पावसासाठी प्रार्थना केली.

## व्यापक जनहित व विद्यार्थ्यांच्या भविष्याला सर्वोच्च प्राधान्य देत
# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नीट परीक्षेचे पेपर फुटल्यानंतर गेल्या ३५ दिवसांपासून दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉक्रोच जनता पार्टी व विद्यार्थ्यांकडून आंदोलन सुरू होते. यासंदर्भात कॉक्रोच जनता पार्टी व विद्यार्थ्यांकडून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी सुरू होती. अखेर व्यापक जनहित आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान,



राजीनाम्याच्या घोषणेनंतर धर्मेंद्र प्रधान यांनी एक्सवर दोन पानांचे पत्र शेअर करून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

जंतरमंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली तिचा राष्ट्रविरोधी शक्तींनी गैरफायदा घेऊ नये, देशाची एकता कायम राहावी, भारतातील एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणींत अडकू नये, आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यासात घालवावा आणि करिअर घडवण्यावर लक्ष केंद्रित करावे, याच गोष्टीचा विचार करून मी माझा राजीनामा पंतप्रधानांकडे पाठवला आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

एक सशक्त, सर्वसमावेशक व दूरदृष्टी असलेली शिक्षण पद्धती हीच एका सशक्त राष्ट्राची पायाभरणी असते यावर माझा सदैव विश्वास आहे. मी देशातील तरुणांच्या आकांक्षा, भावना व त्यांच्या रास्त अपेक्षांचा मनापासून आदर करतो. भारतातील युवा पिढीची स्वप्ने पूर्ण करणे आपल्या सर्वांच्या राजकीय व सामाजिक जीवनाचा नैतिक संकल्प राहिला आहे. आदरणीय पंतप्रधानांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली राष्ट्राची सेवा करण्याची जी संधी मला मिळाली, त्याबद्दल मी पंतप्रधानांचे आभार व्यक्त करतो, असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी कॅबिनेट मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे देण्यात आली आहे.

## अमरनाथ यात्रेला पुन्हा सुरुवात

**जम्मू :** खराब हवामानामुळे आणि भूस्खलनामुळे सहा दिवसांपासून थांबलेली वार्षिक अमरनाथ यात्रा शनिवारपासून (दि. २५) जम्मू येथून पुन्हा सुरू झाली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ६,०००हून अधिक यात्रेकरूंची एक नवीन तुकडी भगवती नगर बेस कॅम्पवरून काश्मीर खोऱ्यातील बाल्टाल बेस कॅम्पकडे रवाना झाली आहे. जम्मू-काश्मीरमधील सततच्या पावसामुळे व खराब हवामानामुळे खबरदारीचा उपाय म्हणून १९ जुलै रोजी ही यात्रा स्थगित करण्यात आली होती.

## निवडक

### नाशिक, पालघरमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के; नागरिकांत घबराट

**नाशिक :** नाशिक व पालघर जिल्ह्यांत भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांत घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात शनिवारी सकाळी एकापाठोपाठ चार धक्के बसले, तर पालघर जिल्ह्यातही भूकंपाचे सत्र कायम असल्याचे पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### वारीच्या बंदोबस्तावरील `एसआरपीएफ'ची आत्महत्या

**पंढरपूर :** आषाढीनिमित्त लाखो भाविकांच्या सुरक्षेसाठी तैनात राज्य राखीव पोलीस दलातील जवानाने स्वतःवर बंदुकीने गोळ्या झाडून जीवन संपवले. यामुळे पंढरपूरसह पोलीस दलात खळबळ उडाली. पहाटेच्या महापूजेवेळी ही घटना घडली. रामेश्वर साबणे असे ३० वर्षीय एसआरपीएफ जवानाचे नाव आहे. ते मूळचे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी होते. आत्महत्येमागील कारण अद्याप समोर आले नाही.

## आषाढी पर्वानिमित्त पंढरपुरात वारकऱ्यांसाठी ५० हजार केळींचे वाटप

### आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांच्याकडून फराळरूपी सेवाभाव



**पंढरपूर : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात आलेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या वतीने फराळ म्हणून तब्बल ५० हजार केळींचे मोफत वाटप करण्यात आले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक दिवस पायी वारी करून पंढरीत दाखल झालेल्या वारकऱ्यांना उपवासाच्या दिवशी पौष्टिक, ऊर्जादायी आणि सहज उपलब्ध होणारा फराळ मिळावा या सेवाभावी भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. पंढरपुरातील मुख्य दर्शन रांगा, वारकऱ्यांच्या विसाव्याची ठिकाणे तसेच विविध मठांच्या परिसरात हजारो वारकऱ्यांना केळींचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले. स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेत सेवाभावाने वितरणाची जबाबदारी पार पाडली. 'ज्ञानबा-तुकाराम'च्या अखंड गजरात आणि विठ्ठलनामाच्या भक्तिमय वातावरणात ही सेवा पार पडल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. उपवासाच्या दिवशी केळी हे पौष्टिक व ऊर्जादायी फळ असल्याने वारकऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. अनेक वारकऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या या सेवाभावी उपक्रमाबद्दल **(पान २ वर..)**

## नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून एक मोठी जबाबदारी -नगरसेवक परेश ठाकूर

### ■ सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये चौथा इन्व्हेस्टिचर सोहळा उत्साहात

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून ती एक मोठी जबाबदारी, सेवा आणि इतरांना प्रेरणा देण्याची संधी असते, असे प्रतिपादन सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे चेअमरन तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी इन्व्हेस्टिचर सोहळ्यावेळी केले. उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीचा चौथा इन्व्हेस्टिचर सोहळा शनिवारी (दि. २५) शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला.



या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर आणि पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारी, आत्मविश्वास आणि लोकशाही मूल्ये विकसित करणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी व्यासपीठावर विशेष पाहुणे म्हणून शाळेचे चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, रयत रायगड विभागाचे पीआरओ बाळासाहेब कारडे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेष म्हात्रे, जिज्ञासा कोळी, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय आयुक्त मोहन कोंगरे, आरटीपीएस खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी तसेच स्थानिक स्कूल कमिटी मेंबर कविता खारकर, निलेश खारकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राममधील सहभागींशी आज पंतप्रधानांचा संवाद

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि. २६) दुपारी ४.३० वाजता दूरदृश्य प्रणालीद्वारे 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम २०२६'मधील सहभागींशी संवाद साधणार आहेत. भारतातील सीमावर्ती गावांना देशातील 'पहिले गाव' मानणे आणि 'विकसित भारत'च्या प्रवासात त्यांना सक्रिय भागीदार बनवणे या पंतप्रधानांच्या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी 'माय भारत'द्वारे, 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम'ची रचना करण्यात आली आहे. 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम २०२६'चे आयोजन ४ जून ते ३० जूनदरम्यान दोन टप्प्यांत करण्यात आले असून यात लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील ७४ 'व्हायब्रंट' गावांचा समावेश होता. तीन लाखांहून अधिक तरुणांनी भाग घेतलेल्या देशभरातील ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेतून प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४००हून अधिक तरुणांची यासाठी निवड करण्यात आली होती.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे

**रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे**

प्लॉट न. 01 व 02, सेक्टर-12, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड-410206

U-Dise No.-27244100042 CBSE Affiliation No. 1131483 School No.31472

शाळेसाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| पदनाम | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या |
|---|---|---|
| शिपाई | 10 वी पास | 03 |

- वरील पदासाठी जागा भरावयाच्या आहेत, तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व त्यासोबत आधार कार्ड, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व एक फोटो प्राचार्य, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे, प्लॉट नं. 1 आणि 2, सेक्टर-12, उलवे, ता.-पनवेल, जि.- रायगड - 410206 येथे जमा करणे.
- उमेदवार सोमवार, 10 ऑगस्ट 2026 रोजी किंवा त्यापूर्वी rtpsulwe@gmail.com या ईमेलवर किंवा टपालाने अर्ज सादर करू शकतात.
- आवश्यक असल्यास संपर्क - सौ. दीप्ती ठाकूर - (शाळा कार्यालय) 8689998947

मा. श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
चेअरमन,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.

## 'भगव्या दहशतवादा'च्या फेक नॅरेटिव्हचा पर्दाफाश



ज्यांचा हा देश आहे त्या हिंदूंनाच देशात दहशतवादी ठरवण्याचे षड्यंत्र कसे रचले गेले, याची कहाणी वाचा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सुरक्षा विभागाचे माजी अवर सचिव आर.व्ही.एस. मणी यांच्या मुलाखतीतून... सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धाब्यावर बसवणाऱ्या काँग्रेस राजवटीचे हे कारस्थान या मुलाखतीतून उघड झाले आहे. 'एएनआय'च्या स्मिता प्रकाश यांनी घेतलेली ही मुलाखत संपादित स्वरूपात 'मुंबई तरुण भारत'ने प्रकाशित केली आहे. ती आम्ही 'रामप्रहर'च्या वाचकांसाठी आजपासून पाच भागांमध्ये रोज सलग प्रसिद्ध करीत आहोत.



# संतांनी पर्यावरणपूरक जीवनाचा संदेश दिला –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पंढरपूर : प्रतिनिधी**

राज्यात शेकडो वर्षापासून संतांनी आपल्या विचारातून समाज प्रबोधन केले. सर्व संतानी पर्यावरणाचे महत्त्व सांगून पर्यावरणपूरक जीवनाचा संदेश दिला आहे. हाच संदेश सर्वांपर्यंत पोहचविण्याचे काम 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमातून केले जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरणीय व वातावरणीय बदल विभागातर्फे आयोजित 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' उपक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री बोलत



होते. यावेळी जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरण विभागाचा हा उपक्रम खूप चांगला असून प्राचीन काळापासून आलेले वैष्णवांचे हे विचार गावोगावी जाऊन पोहोचविण्यात येत आहेत. सध्या जगासमोरील सर्वात मोठा प्रश्न हा पर्यावरणाचा आहे. हा प्रश्न कोणतीही एक व्यक्ती सोडवू शकत नाही. त्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करूया, असे आवाहनही त्यांनी केले.

या उपक्रमात संजय महाराज पाचपोर यांनी कीर्तनातून, संध्याताई साकी यांनी भारुड तर शाहीर माळी यांनी पोवड्यातून पर्यावरण जागृतीचे महत्त्वपूर्ण काम केले असून या वारीत ही ते चांगले काम करत आहेत व ते पुढे ही असेच सुरू ठेवावे असे सांगून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कीर्तन, भारुड ज्ञान जात असल्याबद्दल मुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले.

प्रारंभी पर्यावरण जागृतीचा संदेश देणारे किर्तन, भारुड व पोवाडा चे सादरीकरण मुख्यमंत्री यांच्यासमोर करण्यात आले. त्यानंतर पावलीचा कार्यक्रम झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस यांनी फुगडी खेळली. त्यानंतर अमृता फडणवीस यांनी महिला कलाकार यांच्या समवेतही फुगडी खेळली. मुख्यमंत्री व पालकमंत्री यांनीही हरी नामाच्या गजरात फुगडी खेळली. यावेळी मुख्यमंत्री व सर्व उपस्थितांनी टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत पावली केली.

शासकीय विश्रामगृह येथे बाल वारकरी यांनी 'ज्ञानोबा राया, तुकोबा राया' म्हणत मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री देखील बाल वारकऱ्यांसोबत भजनात दंग झाले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह परिसरात बेल वृक्षाचे रोपण करण्यात आले.

## जिल्हा परिषद शाळा व वानस्ते गाव विठूच्या गजरात निघाले न्हाऊन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेने आषाढी एकादशी निमित्ताने मोठ्या भक्तीमय वातावरणात दिंडी काढून संपूर्ण परिसर विठूरायाच्या गजरात न्हाऊन निघाले होते.

सकाळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ, महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून शाळेपासून दिंडी काढून त्या दिंडी मध्ये पालखी, लेझीम, फुगडी, रिंगण, भजन गात मोठ्या उत्साहात संपूर्ण गावातून फिरून या दिंडीच्या पालखीचे दर्शन सर्व गावातील भक्तगणांनी मोठ्या उत्साहात घेऊन विठूच्या गजरात सारे सामिल होऊन दिंडी काढली.

दिंडीतील रिंगण सर्वांचे आकर्षण ठरले होते. जणूकाही बाल वारकऱ्यांच्या रूपात पंढरीच येथे अवतरली होती या कार्यक्रमाला देवचंद नास्कर, राजाराम राऊत, मनोहर नास्कर, अरूणा आदिंसह या दिंडीत सामिल झाले होते.



## नेरळजवळ मालगाडीचे १६ डबे वेगळे; मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या नेरळ रेल्वे स्थानकाजवळ शनिवारी दुपारी मालगाडीच्या दोन डब्यांमधील कपलिंग तुटल्याने मालगाडीचे तब्बल १६ डबे इंजिनपासून वेगळे झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे सुमारे पाऊण तास रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला असून मुंबईकडे जाणाऱ्या लोकल गाड्या ठिकठिकाणी थांबवाव्या लागल्या. त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले.



लोणावळा येथून कल्याणच्या दिशेने निघालेली मालगाडी दुपारी सुमारे ३.४५ वाजण्याच्या सुमारास नेरळ रेल्वे पाडा गेट परिसरात आली असता दोन डब्यांमधील कपलिंग निघाले. त्यामुळे इंजिनासह पुढील भाग नेरळ रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचला, तर मागील १६ डबे काही अंतरावर थांबून राहिले.गार्ड डब्यातील महिला गार्ड यांच्या निदर्शनास ब्रेक पाईपमधील दाब (प्रेशर) कमी झाल्याने ही बाब लक्षात आली. त्यांनी तत्काळ लोको पायलटला माहिती दिल्यानंतर मालगाडी नेरळ स्थानकात सुरक्षित थांबविण्यात आली.दरम्यान, वेगळे झालेले डबे रेल्वे फाटक परिसरात उभे राहिल्याने रेल्वे फाटक बंद ठेवावे लागले. परिणामी रस्त्यावरही मोठी वाहतूक कोंडी झाली.घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने मालगाडी रिव्हर्स घेऊन वेगळे झालेले डबे पुन्हा जोडण्याची प्रक्रिया सुरू केली.

## कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलने प्रकाशित केला 'नवी मुंबई वार्षिक आरोग्य अहवाल'

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईने 'नवी मुंबई वार्षिक आरोग्य अहवाल' प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल हॉस्पिटलच्या 'डिपार्टमेंट ऑफ लॅबोरेटरी मेडिसिन'ने वर्षभर केलेल्या एका व्यापक आरोग्य अभ्यासावर आधारित आहे. हॉस्पिटलच्या ८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून हा अहवाल जारी करण्यात आला आहे.



'नवी मुंबई वार्षिक आरोग्य अहवाल' माहितीवर आधारित आहे. याचा उद्देश या भागातील लोकांच्या आरोग्याचे वास्तव समोर आणणे हा आहे, जेणेकरून डॉक्टर, स्थानिक रहिवासी आणि नोकरदार वर्ग आधीपासूनच आपल्या आरोग्यावर लक्ष ठेवून त्यात सुधारणा करू शकतील. हा अहवाल एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान केलेल्या ३२,२५३ 'एक्झिक्युटिव्ह हेल्थ चेकअप' दरम्यानच्या १,००,९८६ लॅब चाचण्यांच्या गोपनीय माहितीवर आधारित आहे. यामध्ये १३,९०१ महिला आणि १८,३५२ पुरुषांचा समावेश होता, ज्यांचे सरासरी वय ४४.८ वर्षे आहेम्हणजेच यामध्ये प्रामुख्याने नोकरदार व्यावसायिक समाविष्ट आहेत.

हॉस्पिटलचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. शशिकांत पवार म्हणाले, "या आठ वर्षांमध्ये आमचे हॉस्पिटल नवी मुंबई आणि आसपासच्या भागातील लोकांच्या सेवेत सातत्याने आणि जबाबदारीने पुढे वाटचाल करत आहे. आजारावर उपचार करण्याबरोबरीने, अगदी सुरुवातीच्या टप्प्यातच त्याचा प्रतिबंध करणे आणि आजार होऊच नये यासाठी आरोग्याची काळजी घेणे यावर आम्ही जास्त भर देतो. आजार लवकर ओळखणे, अचूक निदान आणि योग्य उपचारांना आम्ही प्रोत्साहन देतो, जेणेकरून सर्वसामान्य नागरिक आणि संपूर्ण समाजाचे आरोग्य दीर्घकाळपर्यंत चांगले राखता येईल.हाअहवाल आमच्या याच वचनबद्धतेची साक्ष देतो. आम्ही सर्वोच्च पातळीवरील क्लिनिकल उत्कृष्टता आणि रुग्ण-देखभालीच्या मानकांचे पालन करत, चांगल्या आरोग्य सेवांचा विस्तार करण्यासाठी नेहमीच सज्ज आहोत."

लॅबोरेटरी मेडिसिनच्या डायरेक्टर आणि मायक्रोबायोलॉजी व इन्फेक्शन प्रिव्हेंशनच्या कन्सल्टंट डॉ. पूनम गुप्ता यांनी या अहवालातील निष्कर्ष सादर केले. यामधून एक विशेष बाब समोर आली आहे. हे निष्कर्ष दर्शवतात की, लोकांमध्ये कार्डिओमेटाबॉलिक (हृदय आणि चयापचय म्हणजेच मेटाबॉलिझमशी संबंधित) आणि न्यूट्रिशनल (पोषणविषयक) कमतरतेचे असे अनेक छुपे धोके आहेत, जे जवळपास सगळ्यांमध्ये आहेत; पण बऱ्याचदा त्यांची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. याच कारणामुळे वेळेत त्यांचे निदान आणि योग्य उपचार होऊ शकत नाहीत.

जे नोकरदार लोक वरवर पूर्णपणे निरोगी दिसतात, त्यांच्यासाठीही वेळोवेळी नियमित आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक प्रकरणांमध्ये आजाराचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान होणे, त्यापासून बचाव करण्याची सर्वात उत्तम संधी देते.

## वृक्ष कोसळल्याने रिक्षाचा चक्काचूर; सुदैवाने प्रवासी व रिक्षाचालक बचावला

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाजवळील शनी मंदिराच्या स्वागत कमानीसमोर शुक्रवारी दुपारी दुभाजकामध्ये असलेला महाकाय वृक्ष रिक्षावर कोसळला. यात रिक्षाचे मोठे नुकसान झाले. मात्र, चालकाच्या प्रसंगावधानामुळे चालक आणि प्रवासी दोघेही बचावले. सतर्क नागरिकांनी देखील तातडीने धाव घेत रिक्षामध्ये अडकलेल्यांना बाहेर काढण्यास मदत केली. झाड रस्त्यामधोमध पडल्याने काही काळ वाहतूककोंडी झाली होती.



दुपारी साडेतीनच्या सुमारास पाऊस किंवा वारा नसतानाही हा वृक्ष अचानक उन्मळून पडला. रिक्षाचालक प्रवाशासह जात असताना झाड कोसळत असल्याचे लक्षात येताच त्याने तातडीने रिक्षा थांबवून दोघांनाही बाहेर काढले. काही क्षणांतच वृक्ष रिक्षावर कोसळल्याने वाहनाचा चक्काचूर झाला. चालकाने प्रसंगावधान दाखविले नसते, तर मोठी दुर्घटना घडली असती असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच भाजपच्या नगरसेविका माधुरी सुतार, नगरसेविका मीरा पाटील, समाजसेवक जयेंद्र सुतार तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सुतार यांनी तातडीने विभाग अधिकारी, उद्यान विभाग आणि अग्निशमन दलाला कळवून तातडीने मदत पथक पाठविण्याची मागणी केली. अग्निशमन दलाला हा मोठा वृक्ष हटवण्यास कष्ट घ्यावे लागले. वृक्ष हटविल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. यावेळी नगरसेविका सुतार म्हणाल्या की, शहरात वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना वाढत आहेत. याबाबत जनता दरबार आणि महासभेतही प्रशासनाचे लक्ष वेधले होते. गंभीर अपघात टाळण्यासाठी जुन्या वृक्षांचे तातडीने सर्वेक्षण करावे. कॉंक्रिटने वेढलेले वृक्ष व त्यांची मुळे तातडीने मोकळी करावीत अशी मागणी प्रशासनाकडे केल्याचे माधुरी सुतार यांनी सांगितले.

## गोविंदांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकार सकारात्मक; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले कार्यवाहीचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

गोकुळाष्टमी उत्सवानिमित्त राज्यातील सुमारे २ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्याची मागणी युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित विभागाला "याप्रकरणी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी" असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

पूर्वेश सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिलेल्या पत्रात गोकुळाष्टमी आणि दहीहंडी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले होते. राज्यभर लाखो गोविंदा जीव धोक्यात घालून दहीहंडी उत्सवात सहभागी होत असतात. सरावादरम्यान तसेच प्रत्यक्ष दहीहंडी फोडताना अनेक



गोविंदांना दुखापती होतात. अनेक गोविंदा मंडळांची आर्थिक परिस्थिती मर्यादित असल्याने उपचाराचा खर्च उचलणे कठीण जाते. त्यामुळे राज्यातील सर्व गोविंदांना व्यापक विमा संरक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यापूर्वी राज्य शासनाच्या माध्यमातून सुमारे एक लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र यंदा हा लाभ वाढवून सुमारे दोन लाख गोविंदांना "महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन" या नियोजन समितीच्या माध्यमातून विमा संरक्षण मिळावे, अशी मागणी सरनाईक यांनी केली होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रावर "याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी" अशी स्पष्ट नोंद करून संबंधित यंत्रणेला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

याबाबत पूर्वेश सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार व्यक्त करत सांगितले की, "गोविंदांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. राज्य शासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे लाखो गोविंदांना मोठा दिलासा मिळणार असून गोकुळाष्टमीचा उत्सव अधिक सुरक्षित वातावरणात साजरा होण्यास मदत होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## रिटघर विद्यालयात आषाढी एकादशी व वृक्षदिंडी कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूरउच्च माध्यमिक विद्यालय रिटघर ता.पनवेल येथे आषाढी एकादशी व वृक्षदिंडी कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

या प्रसंगी श्री विठ्ठल रुक्मिणी ची वेशभूषा विद्यार्थ्यांनी केलीहोती. इतर विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा केली होती.इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी रिटघर गावात काढण्यातआली. या दिंडीत वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या.तसेच सर्व विद्यार्थ्यांनी रिटघर गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भजन व आरती पेटी,तबल्यावर सादर केली. .प्रल्हाद गुलाब भोपी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

विद्यालयात विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले. यानंतर सांस्कृतिक विभागप्रमुख खुटले मॅंडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भजन व आरतीकेली व कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वच्छता संदेशाच्या दिंडीने शिरवणेमध्ये जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी एकादशी निमित्त नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र १५/१०१ प्राथमिक व माध्यमिकच्या वतीने दिंडी काढण्यात आली. त्यामध्ये भाजपाच्या स्थानिक नगरसेविका माधुरी जयेंद्र सुतार उपस्थित होत्या. त्यांनी भावभक्तीने दिंडीमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

स्वच्छतेचा संदेश देणारा ही दिंडी होती. ज्यामध्ये आपली परंपरा व संस्कृती जपताना, परिसरात स्वच्छता राखण्यासाठी आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या या स्वच्छतेच्या शिकवणीचे नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्याध्यापिका माधुरी नारखेडे व रंजना साळी तसेच तमाम शिक्षक वृंदाचे सुतार यांनी कौतुक केले. प्रभागातील नागरिकांना स्वच्छता राखा व आरोग्य जपा असा संदेश माधुरी सुतार यांनी दिला.




पान १ वरुन

## आषाढीनिमित्त पंढरपुरात वारकऱ्यांसाठी ५० हजार केळींचे वाटप

कृतज्ञता व्यक्त करीत आयोजकांचे आभार मानले.

या सेवाकार्यात प्रवीण काळबागे, बबन बारगजे, निलेश दराडे, अनिल कोकाटे, तेजस बाबर, शैलेश गवांद, आदर्श सिंग, प्रदीप घुगे, राकेश गायकवाड, निलेश पाटील, बालू मुंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वारकऱ्यांची सेवा केली. आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर वारकऱ्यांच्या सेवेला सर्वोच्च स्थान देत राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचा आदर्श पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

## नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून एक मोठी जबाबदारी –नगरसेवक परेश ठाकूर

यावेळी मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना विविध पदांची जबाबदारी सोपवत अधिकृतपणे विद्यार्थी नेतृत्वाची धुरा देण्यात आली. नवनियुक्त विद्यार्थी नेत्यांना बॅज व पदचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेची शिस्त, परंपरा व प्रतिष्ठा जपत प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडण्याची शपथ घेतली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर यांनी नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून ती एक मोठी जबाबदारी, सेवा आणि इतरांना प्रेरणा देण्याची संधी असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या नेतृत्वगुणांचा उपयोग शाळेच्या प्रगतीसोबतच समाजाच्या विकासासाठी करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खाटवकर, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांच्या सहकार्याने हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व भव्य वातावरणात पार पडला.

## फ्लॅटचा बेकायदेशीर ताबा घेऊन आत्महत्या करण्याची दिली धमकी

**नवीन पनवेल :** फ्लॅटचा बेकायदेशीरपणे ताबा घेऊन मुलासह आत्महत्या करण्याची धमकी दिल्याप्रकरणी सीमा संतोष गिरी यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २४ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल हजारे हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांनी सेक्टर ४ इ कळंबोली येथील विक्री कराराअन्वये विकत घेतलेला आणि ताब्यातील फ्लॅटचा १४ जुलै ते २४ जुलैपर्यंत सीमा गिरी यांनी बेकायदेशीरपणे ताबा घेतला आणि त्या आतमध्ये बसून राहिल्या. त्यांना निघून जाण्यास सांगितले असता त्यांनी मुलासह आत्महत्या करण्याची धमकी दिली.

# पनवेल रेल्वे स्थानकात जुने छत व खांब कोसळला; सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकात सुरू असलेल्या प्लॅटफॉर्म विस्तारीकरणाच्या कामादरम्यान अचानक जुने छत आणि ओव्हरहेड इक्विपमेंट सपोर्ट खांब कोसळल्याने काही काळ परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली.

मुंबई रेल्वे विकास महामंडळ यांच्या माध्यमातून पनवेल रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण आणि प्लॅटफॉर्म विस्तारीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत जुन्या व धोकादायक ठरत असलेल्या संरचना हटवण्याचे काम सुरू असताना अचानक स्थानकावरील जुने छत आणि ओएचई लाईनचा सपोर्ट खांब कोसळला.

घटना घडताच रेल्वे प्रशासन, सुरक्षा कर्मचारी आणि संबंधित यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. परिसर सुरक्षित करून ढिगारा हटवण्याचे काम त्वरित सुरू करण्यात आले. या घटनेमुळे काही काळ कामात अडथळा निर्माण झाला असला तरी रेल्वेच्या नियमित वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नाही. रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले की, पनवेल स्थानकावरील लोकल तसेच लांब पल्ल्याच्या सर्व गाड्यांची वाहतूक सुरळीत सुरू असून प्रवाशांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी सुरक्षा मानकांचे अधिक काटेकोर पालन करत पुढील कामे केली जाणार असल्याचेही प्रशासनाने सांगितले.

या घटनेमुळे स्थानकावरील सुरू असलेल्या विकासकामांदरम्यान सुरक्षा उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत असून, कामकाजाच्या प्रत्येक टप्प्यावर अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी महापौर नितीन पाटील लीन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवशयनी आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर पनवेल शहरातील श्री विठ्ठल मंदिरात भक्तिमय वातावरणात महापूजा पार पडली. या प्रसंगी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी आपल्या धर्मपत्नीसह विठ्ठल-रुक्मिणीची मनोभावे महापूजा करून दर्शन घेतले.

पूजा संपन्न झाल्यानंतर महापौर नितीन पाटील यांनी विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी लीन होऊन सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. श्री विठ्ठल-रुक्मिणीची कृपा सर्वांवर सदैव राहो आणि प्रत्येकाच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य व आनंद नांदो, अशी भावना त्यांनी या वेळी व्यक्त केली.

या वेळी रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी, रोटरी क्लब ऑफ सिम्फनी, रोटरी क्लब ऑफ सनराइज आणि रोटरी क्लब ऑफ महानगर यांच्या वतीने महापौरांना तुळशीचे रोप भेट देण्यात आले.

## जनतेच्या रक्षणकर्त्यांसोबत भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी साजरी



**पनवेल : वार्ताहर**

जनतेच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही आषाढी एकादशीचा भक्तिमय आनंद अनुभवता यावा, या उद्देशाने उद्यमसखी संस्थेच्या अध्यक्षा सवक्षा चितळे यांच्या संकल्पनेतून पनवेल शहर पोलीस ठाण्यात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात अभंग गायन, नामस्मरण, विठ्ठलनामाचा गजर आणि संतपरंपरेचे दर्शन घडविणारी वेशभूषा यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. विठ्ठल व विविध संतांच्या वेशभूषेतील सादरीकरणाने उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मंत्रमुग्ध झाले. या उपक्रमामुळे पोलीस बांधवांना प्रत्यक्ष वारीचा आध्यात्मिक आनंद अनुभवता आला.

या कार्यक्रमात उद्यमसखी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. संतांच्या वेशभूषेत ॲड.अक्षता नेहते (संत एकनाथ), जयश्री ताम्हणकर (संत तुकाराम), अवनी पेंडसे (संत ज्ञानेश्वर), माधुरी चितळे (संत नामदेव), मानसी जगताप (संत जनाबाई), अंजली गोविलकर (वारकरी) आणि अक्षया चितळे (भगवान विठ्ठल) यांनी प्रभावी सादरीकरण करून भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वपोनि बाळा कुंभार यांच्यासह महोत्सव ड्रेसवाला, पनवेल यांनी वेशभूषेची व्यवस्था केली. वेशभूषाकार दिनेश मालोटकर आणि रंगभूषाकार शेखर केमनाईक (मालाड, मुंबई) यांनी विशेष सहकार्य केले. आध्यात्मिकता, समाजसेवा आणि पोलीस दला प्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पोलीस बांधवांना वारीचा आनंद देणारा हा उपक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून जनार्दन भगत् शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता अकरावीच्या विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी 'वृक्ष दिंडी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन दि. २४ जुलै या दिवशी करण्यात आले होते. भारतीय संस्कृती, संत परंपरा आणि पर्यावरण यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र आणि श्रध्देचा दिवस मानला जातो.

संतांच्या विचारांमधून समाजात समता, बंधुता, निसर्गप्रेम आणि सेवाभाव यांचे महत्व अधोरेखित केले जाते . याच विचारांचा वारसा विदयार्थ्यांपर्यंत पोहोचवावा आणि पर्यावरण संरक्षणाची जाणीव त्यांच्यामध्ये दृढ व्हावी या उद्देशाने सांस्कृतिक समितीच्या वतीने या वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याने





आपल्या सोबत एक रोप हातात घेऊन परिसरात वृक्ष दिंडी काढली. मुलींनी पारंपारीक नऊवारी साडी, तर मुलांनी कुर्ता-पायजमा व महाराष्ट्रीयन टोपी परिधान करून उपक्रमाची शोभा वाढवली. हिरवाईचे संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जागरूकतेचा संदेश या दिंडीतून प्रभावीपणे देण्यात आला.

## सीकेटी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त चिमुकल्यांची भक्तिमय वारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे आषाढी एकादशी निमित्त विद्यालयात, पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वर महाराजांची, ग्रंथदिंडीची पालखी काढली. सर्व मुले मुली वारकरी पारंपारिक वेशातडोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन. दिंडीत सहभागी झाले होते.

मुख्याध्यापक सुभाष मानकर यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले, त्यानंतर दिंडी काढण्यात आली. विद्यार्थी उत्साहाने विठू नामाचा गजर करत दिंडीत आनंदाने नाचत होते. शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## विठ्ठलनामाच्या गजरात आणि वृक्षारोपण संवर्धनाच्या संदेशासह आषाढी एकादशी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे शनिवार, दि. २५ जुलै रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळा व वृक्षदिंडी सोहळा भक्तिमय, नादमय आणि संगीतमय वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

विद्यालय परिसरातून पारंपरिक पद्धतीने वृक्षदिंडी काढण्यात आली. वारकरी वेशातील विद्यार्थी, हातात टाळ, मृदुंग, वीणा, चिपळ्या आणि मुखी अखंड "विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल.." चा गजर करीत भक्तिभावाने सहभागी झाले होते. या मंगलमय वातावरणामुळे जणू पंढरपूरच्या आषाढी वारीचेच दर्शन विद्यालयात घडत असल्याची अनुभूती उपस्थितांना मिळाली.



यावर्षीच्या वृक्षदिंडी सोहळ्याची विशेष आकर्षक बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाचे फलक हातात घेऊन पर्यावरण संरक्षणाचा जागर प्रचार केला. प्राचार्य कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या भक्तिमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायातील भक्ती, समता, सेवा, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. बालवारकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने, विठ्ठलनामाच्या अखंड गजराने आणि वृक्षसंवर्धनाच्या प्रेरणादायी संदेशाने आषाढी एकादशीचा पालखी सोहळा व वृक्षदिंडी सोहळा अत्यंत भक्तिमय, संस्कारमय आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

आषाढी एकादशीच्या वृक्षदिंडी पालखी सोहळ्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचाय. कैलास म्हात्रे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, माजी क्रीडा शिक्षक प्रताप शिंदे कार्यक्रमास उपस्थित होते.

**पनवेल : आषाढी एकादशीच्या निमित्ताने शनिवारी खारघर मध्ये एकात्मता दिंडी यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात वारकऱ्यांनी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' आणि 'विठ्ठुल विठ्ठुल जय हरी विठ्ठुल' या नामघोषात सहभाग घेतला. पंढरीनाथाच्या चरणी नतमस्तक होत प्रेम, भक्ती आणि एकतेचा संदेश देत ही दिंडी सेक्टर ४ मधील श्री विठ्ठुल मंदिरात आली. या सोहळ्यात भाजपचे खारघर मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक मधू पाटील,शत्रुघ्न काकडे,जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, दीपक शिंदे,भाजप महिला मोर्च्याच्याप्रदेश सचिव संध्या शारबिद्रे, बिना गोगरी, महिला मोर्च्याशहर अध्यक्ष साधना पवार, संजय घरत, राकेश सोनावणे, ॲडव्होकेट राजेंद्र अग्रवाल, सत्यम शर्मा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**







**पनवेल : सुषमा पाटील विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे मध्ये आषाढी एकादशी निमित्त काढण्यात आलेल्या भव्य दिंडी सोहळ्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष दिलीप पाटील ,सचिव डॉक्टर मंदार पनवेलकर ,विश्वस्त अर्जुन गोवारी, समाजसेवक खरात तसेच शिक्षकवर्ग व विद्यार्थी याने सहभाग घेतला आहे.**

## रयतच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठेमध्ये वारी प्रबोधनाची

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत तीर्थक्षेत्र पंढरपूर श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशीनिमित्त रयतच्या लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठे मध्ये वारी प्रबोधनाची मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या वारीच्या पालखी सोहळयासाठी विद्यालयाचे स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन व स्कूल कमिटीचे जेष्ठ सदस्य जयदास गोवारी, माजी चेअरमन शिक्षण प्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे , माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भगवान गोवारी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक गावंड, लेखनिक गोवारी आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर लेझीम पथक ढोल ताशाच्या गजरात विठ्ठलाच्या पालखीची दिंडी कामोठे गावातून काढण्यात आली. यामध्ये वृक्ष लागवड करा आणि पर्यावरण वाचवा ,मुलींना शिकवा, स्वच्छ परिसर आणि निरोगी आरोग्य असे संदेश या प्रबोधन वारीमधून देण्यात आला. या वारीमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशभूषा तसेच विविध संतांच्या वेशभूषेत विद्यार्थी सहभाग झाली होते. तसेच विविध अभंग विद्यार्थ्यांनी सादर केले. विठुरायाच्या नाम गजरात मोठ्या आनंदात विद्यालयाची प्रबोधन वारी पार आंनदी आणि उत्साही वातावरणात पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.




# प्यार किये जा @ ६० वर्षे...

## फुल्ल टू मेहमूद एके मेहमूद कॉमेडी शो







झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

कुंदनकुमार दिग्दर्शित 'हिम्मत'(१९६९) या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळचा हा किस्सा. जितेंद्र आणि अरुणा इराणी यांच्यावर चित्रित होत असलेल्या दृश्यात जितेंद्रला हसायचं होते. एकेक रिटेक वाढत वाढत गेला, पण काही केल्या त्याला मनसोक्त मनमुरादपणे 'हसण्याचा अभिनय' करता येईना. होते असे कधी कधी. त्याची ती अडचण सेटवरच असलेल्या मेहमूदला समजली. त्यावर मेहमूद म्हणाला, डरो मत! मै कॅमेरा के पीछे खडा रहता हू, तुम मेरी तरफ देखना, अपने आप हंसी आ जाऐगी.....

दिग्दर्शक म्हणाला, सायलेन्स.... लाइट्स कॅमेरा ॲक्शन.... दृश्य सुरू झाले आणि जितेंद्रची दिलखुलासपणे हसण्याची वेळ येताच त्याने मेहमूदकडे पाहिले आणि तो जो काही खो...खो...खो करत हसत सुटला त्याला त्याचं हसणं खिदळणे थांबवताच येईना.... मेहमूदने जितेंद्रला हसे फुटावे म्हणून चक्क आपली पॅन्ट खाली केली होती आणि तो केवळ लंगोटावर उभा होता. दृश्य डोळ्यासमोर आले की काय? खुद्द जितेंद्रला कपिल शर्मा शोमध्ये हा किस्सा सांगताना हसू आवरत नव्हते. प्रत्यक्षात सेटवर त्याचं काय झालं असेल ते त्याला ठाऊक. चित्रपटाच्या दुनियेतील अशा गोष्टी, किस्से यांची रंगत भारी.

मेहमूदकडे विनोदबुद्धी ( विनोदाचे टायमिंग) असं काही भन्नाट होते की, त्याच्या खुमासदार शैलीतील विनोदामुळे चित्रपटाचा हीरो विसरला जाई आणि पब्लिक मेहमूदची कॉमेडी पुन्हा पुन्हा एन्जॉय करण्यासाठी पिक्चरचे तिकीट पुन्हा एकदा काढून पाह्यचे. सत्तरच्या दशकात मीदेखील असाच उद्योग करत फक्त आणि फक्त मेहमूदसाठीच मै सुंदर हू, दो फूल, कुवारा बाप, पडोसन , वरदान, सबसे बडा रुपय्या हे चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय केले.

असाच एक ' मेहमूद ' मय धमाल चित्रपट ' प्यार किये जा ' या चित्रपटातील त्याचं वाह वाह प्रॉडक्शन आणि आपल्या बॅनरखाली पिक्चर काढण्याचं जबरा स्वप्न. आपल्या चित्रपटात भूमिका साकारल्याने तू स्टार होशील असे आपल्या प्रेयसीला म्हणजे मीना प्रियदर्शनीला ( मुमताज) दाखवलेले स्वप्न ( बरं हे सगळे तो धमाल ॲक्टिंग करुन दाखवतो) आणि या आपल्या चित्रपटासाठी आपले पिता रामलाल (ओम प्रकाश) यांना ज्या पध्दतीने ' स्टोरी सांगतो ' ते पाहून आपण बसल्या बसल्या भरपेट हसतो. त्याला भयपट बनवायचाय, आणि ते सांगताना घाबरवत घाबरवत तो एकेक दृश्य रंगवतो हा हिंदी चित्रपटाच्या वाटचालीतील सर्वोत्कृष्ट दहा विनोदी दृश्यातील एक. (विनोद साकारणं हा सर्वात अवघड अभिनय. दुर्दैवाने विनोदी कलाकाराला फारसं कोणी गंभीरपणे घेत नाहीत. टाईमपास करतो असं म्हटलं जातं. सी. व्ही. श्रीधर दिग्दर्शित 'प्यार किये जा' (मुंबईत प्रदर्शित २९ जुलै १९६६) च्या प्रदर्शनास साठ वर्षे पूर्ण होत आहेत. मुंबईत मेन थिएटर आमच्या गिरगावातील सेन्ट्रल.


मुळात हा रोमँटिक कॉमेडी चित्रपट पहिल्यांदा १९६४ साली ' कथलोश नेरामिलाई ' या नावाने तमिळ भाषेत बनला, तो सुपर डुपर हिट म्हणून १९६५ साली 'प्रेमिची चुड्डू 'या तेलगू भाषेत त्याची रिमेक करण्यात आली. तोही हाऊसफुल्ल गर्दीत टाळ्या शिट्ट्यानी एन्जॉय केला जाऊ लागताच त्याची 'प्यार किये जा' या नावाने हिंदीत रिमेक केली. तोदेखील सुपर डुपर हिट. माझ्या पिढीने हा आणि असे आणखी अनेक चित्रपट सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात मॅटीनी शो आणि रिपीट रनला एन्जॉय केले. ( त्या काळात दक्षिण मुंबईतील सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये मॅटीनी शोला अप्पर स्टॉलचे तिकीट दर एक रुपया पाच पैसे असे ते परवडत असे. )१९७९साली याच चित्रपटाची कन्नड भाषेत 'प्रोती मदु थमाशे नोड्डू' या नावाने रिमेक केली. हे एवढ्यावरच थांबले नाही. पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपट असा सहजी थांबत नाही.चित्रपट संस्कृतीची हीच तर खरी गंमत आहे. प्यार किये जा या चित्रपटावरुन अभिनेता, निर्माता आणि दिग्दर्शक महेश कोठारे याने 'धुम धडाका' हा धमाल मनोरंजक चित्रपट बनवला. तो मुंबईत १९८५ सालच्या दिवाळीत पडद्यावर आला तोच पहिल्या शोपासूनच पब्लिककडून हाऊसफुल्ल गर्दीत 'धडाकेबाज' स्वागत.

मूळ चित्रपटाची धमाल गोष्ट अशी विविध भाषांतील चित्रपट रसिकांना आवडली. आजच्या पॅन इंडिया चित्रपट निर्मितीच्या युगात मुळात हा चित्रपट तमिळ भाषेत निर्माण होऊन एकाच वेळेस अन्य चार पाच भाषेत तो डब करुन प्रदर्शित झाला असता. पूर्वी रिमेक संस्कृती होती. त्या काळात चित्रपट डबही केले जात, पण त्या डबच्या खाणाखुणा जाणवत. आजच्या तांत्रिक प्रगतीत ते फारसे जाणवत नाही.

'प्यार किये जा'मध्ये शशी कपूर, राजश्री, कल्पना, किशोरकुमार, मुमताज, ओम प्रकाश आणि.... आणि मेहमूद इत्यादींच्या प्रमुख भूमिका. पण सर्वाधिक भाव खाऊन जातो तो मेहमूद. बिचारा शशी कपूर. पहिल्यांदाच मेहमूदसोबत काम केले आणि श्रेय मेहमूदला गेला. खरं तर नायकाच्या भूमिकेसाठी राजेंद्रकुमारला विचारले असता त्याने नकार दिला ( मेहमूदच्या भूमिकेचं महत्व कदाचित लक्षात आले असावे. या चित्रपटाच्या यशापासून मेहमूदची "कॉमेडी नायक" या दिशेने पावले पडायला लागली आणि त्यातून त्याला मस्ताना, लाखों मे एक, अलबेला असे चित्रपट साकारता आले. कुवारा बाप या चित्रपटाचा निर्माता दिग्दर्शक खुद्द तोच आहे.

प्यार किये जा या चित्रपटाची राजेंद्र कृष्ण यांची तर संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे. चित्रपटातील दिन जवानी के चार यार प्यार किये जा ( पार्श्वगायक किशोरकुमार), दिल हमे दे दिया ( लता मंगेशकर आणि किशोरकुमार), ओ मेरी मैना, तू मान ले मेरा कहना ( मन्ना डे आणि उषा मंगेशकर) ही गाणी लोकप्रिय ठरली. महेश कोठारेचा ' धुम धडाका ' पुणे शहरात प्रदर्शित व्हायच्या शुक्रवारी एका प्रदर्शकाने त्याच शुक्रवारी रिपीट रनला ' प्यार किये जा ' प्रदर्शित केला. महेश कोठारेना ही बाब अजिबात रुचली नाही म्हणून त्यांनी प्यार किये जाचे निर्माते श्रीधर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, चिंता करू नकोस, तुझा मराठी चित्रपट अधिक धमाल उडवतो. त्याची लोकप्रियता नक्कीच वाढेल....धुम धडाकामध्ये शशी कपूरच्या जागी महेश कोठारे, किशोरकुमारच्या जागी अशोक सराफ आणि मेहमूदच्या जागी लक्ष्मीकांत बेर्डे अशी मस्त टीम.

लक्ष्मीकांत बेर्डेला खरी ओळख मिळाली ती 'धुमधडाका' या सिनेमातून. हा मल्टिस्टारर सिनेमा होता. यात शरद तळवलकर, निवेदिता जोशी, प्रेमा किरण, सुरेखा, जयराम कुलकर्णी, भालचंद्र कुलकर्णी, सरोज सुखठणकर, बिपीन वर्टी इत्यादींच्या प्रमुख भूमिका. त्यात लक्ष्मीकांत बेर्डेंने आपल्या विनोदी भूमिकेचा ठसा उमटवला. हा सिनेमा लक्षाला कसा मिळाला याचाही किस्सा. लक्ष्मीकांत बेर्डेनीच तो एकदा मला सांगितला होता. 'झोपी गेलेला जागा झाला' हे नाटक करत होतो. बबन प्रभू यांनी केलेली भूमिका त्यांच्यानंतर लक्ष्या करत होता. महेशनं त्यातलं त्याच काम पाहिलं. त्याचवेळी त्यानं लक्ष्याला प्रॉमिस केलं की, 'लक्ष्या, मी जेव्हा सिनेमा काढेन तेव्हा तुला त्यात घेईन.'



महेश व लक्ष्याची ती पहिलीच ओळख होती. पण तो लक्ष्याचा कामावर जाम खूश होता. महेशने ठरवून टाकलं होतं की, श्रीधर दिग्दर्शित 'प्यार किये जा'वर सिनेमा करायचाय आणि त्यात मेहमूदचा रोल लक्ष्या करणार. त्यावेळी त्याच्या सिनेमाचं नावही ठरलं नव्हतं. मग ते 'धुम धडाका' असं ठरलं.

जेव्हा महेश कोठारेने 'धुम धडाका ' हा सिनेमा केला, तेव्हा महेश त्याचा शब्द विसरला नाही. लक्ष्याला वाटत होतं की त्याला चित्रपटात घेऊन महेशने रिस्कच घेतली होती. पण चित्रपट व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाला." महेश कोठारेने एकदा मला सांगितले,"माझे आई-वडील 'झोपी गेलेला जागा झाला' या नाटकात काम करत होते. बबन प्रभू गेल्यानंतर काही काळाने दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांना हे नाटक त्यांच्या स्मरणार्थ पुन्हा करावं वाटू लागलं. तालमी सुरु झाल्या. बबन प्रभूंनी हे नाटक एका उंचीवर नेऊन ठेवलं होतं. त्यामुळे मला प्रश्न पडला की, आता हे नाटक कोण करतोय? बाबांनी सांगितलं की, एक नवीन मुलगा आहे. मस्त काम करतोय. मी दुसऱ्या दिवशीच तालीम पाहायला गेलो. लक्ष्याला मी तिथं पाहिलं आणि मी लगेचच खिशातून एक रुपया काढून म्हटलं- लक्ष्या, हा एक रुपया... माझ्या पुढच्या सिनेमाचा हिरो तू. चित्रपट होता धुमधडाका."

लक्ष्यानंही तो एक रुपया घेतला आणि तो चित्रपटासाठी कमिटेड झाला, असंही महेश कोठारे यांनी मला सांगितलं. 'धुम धडाका'ने महेश-लक्ष्या ही जोडगोळीही हिट झाली. थरथराट, धडाकेबाज, दे दणादण, झपाटलेला, माझा छकुला, धांगडधिंगा, पछाडलेला असे अनेक हिट सिनेमे 'महेश-लक्ष्या'नं दिले. लक्ष्मीकांत बेर्डे आणि महेश कोठारे ही मैत्री ऑफस्क्रीनही तशीच होती. त्यामुळेच लक्ष्मीकांत हा माझा आत्मा आणि हृदय होता, असं महेश कोठारे म्हणतात. लक्ष्मीकांतने माझ्यासोबत काम करताना कधीही पैशांबद्दल विचारलं नाही. तो कॉन्ट्रॅक्ट साइन करायचा आणि अमाउंट तू टाक असं म्हणायचा, असंही महेश कोठारेंनी एकदा सांगितलं.

असो. आजच्या मल्टीप्लेक्स युगात 'प्यार किये जा'ची रिमेक करता येईल, पण मेहमूद कुठून आणणार? एखाद्या कलाकाराला त्या उंचीचा पर्याय न मिळणं हे त्या कलाकाराचे सर्वात मोठे यश आणि वैशिष्ट्य आहे. विनोदी चित्रपटाला कदाचित प्रतिष्ठा नसेल पण अशा अनेक चित्रपटांनी समाजाच्या अगदी खालच्या माणसापर्यंत भरपूर भरपेट मनसोक्त मनमुराद आनंद दिला हे देणं जास्त महत्त्वाचे आहे.

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना ‘लोकमाता’ आणि ‘पुण्यश्लोक’ ही उपाधी बहाल केली.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चोंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली



बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासन कौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

१७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले. त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्याविषयी अपार आदर निर्माण झाला. ‘राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे’ हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरूंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करून त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात ‘बंधुता’ पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यासारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता.

अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या. भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना ‘पुण्यश्लोक’ ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच ‘पुण्यश्लोक’ म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात ‘लोकमाता’ म्हणून त्यांचे स्थान कायम आहे. महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण ‘अहिल्यानगर’ असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चोंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन व संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना’ ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे. या योजनेअंतर्गत महिलांनाः स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

**-प्रवीण टाके, उपसंचालक,**
(माहिती) विभागीय माहिती
कार्यालय, कोल्हापूर

# आज कारगिल विजय दिवस

कारगिलच्या लढाईत भारताने मिळवलेला विजय 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागवल्या जातात. कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्यांच्या शौर्याची आठवण सदैव जागृत ठेवणारा दिवस असून देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणारा दिवस आहे. २६ जुलै हा कारगिल दिन म्हणून साजरा होतो.

राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे; तर आग्नेयेकडील द्रास व नैऋत्येकडील मश्को खोऱ्यातील तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगील, द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असल्याने



हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी आणि उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये कारगील युद्धाच्या आधीपर्यंत होता. या वेळेस मात्र भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली. या चौक्यांचा ताबा घेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १अ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यांत आला तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्यावरील किल्ल्यांप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. त्यातच अतिउंची व कडाक्याची थंडी काम अवघड करते.


सन १९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या छोट्या चकमकी होत आहेत. सियाचीन हिमनदी वर भारतीयांचे नियंत्रण तसेच सभोवतालचा परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असतात. १९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला तसेच १९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले. हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोत्री अतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला.

१९९८-९९च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले.

**(साभार वेबदुनिया)**

# प्रतिभावंत संगीतकार भास्कर चंदावरकर

शास्त्रीय संगीतातल्या अनेक वादकांनी वेळोवेळी चित्रपटांसाठी संगीतकार म्हणून काम केलं आहे. यात शिव-हरी (संतूरवादक शिवकुमार शर्मा आणि बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया), अली अकबर खान, पंडित रवीशंकर, झाकीर हुसेन, रघुनाथ सेठ, रामलाल यांची नावे ठळकपणे आठवतात. यांच्याशिवाय इतरही अनेक वादक आहेत ज्यांच्या रचनांची चित्रपट संगीतात फारशी चर्चा होत नाही. यातलं एक अत्यंत महत्त्वाचं नाव म्हणजे प्रसिद्ध सतारवादक पं. भास्कर चंदावरकर. त्यांचा जन्म १६ मार्च १९३६ रोजी पुण्यात झाला. त्यांचे भारतातल्या विविध लोकसंगीतांवर आधारित अनेक वाद्य अल्बम्स प्रकाशित झाले आहेत. त्यांनी चित्रपटांना संगीतही दिलं असल्याचं फार कमी लोकांना माहीत आहे. हे सर्व कलात्मक चित्रपट होते, ज्यांना भावपूर्ण आणि आशयानुरूप संगीत देऊन भास्कर चंदावरकर यांनी एक प्रतिभावंत संगीतकार म्हणून ठसा उमटवला.



निमित्त

मराठी रसिकांना भास्कर चंदावरकरांची सख्या रे घायाळ मी हरिणी, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, बांधले मी बांधले इंद्राचे तोरण बांधले यांसारखी गाणी पटकन आठवतात आणि आठवतं 'घाशीराम कोतवाल' या नाटकाचं आगळंवेगळं संगीत. चंदावरकरांनी फक्त या एकाच नाटकाचं संगीत केलं असतं तरी त्यांचं नाव अजरामर झालं असतं. इतकी अद्भूत नि विलक्षण कामगिरी त्यांनी नाटकाला संगीत देताना केलीय.

जगातल्या विविध संगीत प्रवाह नि प्रकारांचा त्यांचा गाढा अभ्यास आणि आधुनिक कलांचा प्रचंड व्यासंग होता. पंडित रवीशंकर, त्यांच्या पत्नी अन्नपूर्णा आणि पंडित उमाशंकर मिश्रा यांच्याकडून सतारवादनाचे धडे त्यांनी गिरवले. चित्रपट कला आणि संगीताचे ते शास्त्रशुद्ध मांडणी करणारे अभ्यासक तथा संशोधक होते. त्यांनी काही पाश्चात्य जाणकारांकडून जॅझ संगीताचंही शिक्षण घेतलं होतं. पाश्चात्य संगीत आणि भारतीय संगीत यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी यावर जगभर व्याख्यानेही दिली. त्यांनी संगीतात अनेक नवनवीन प्रयोग केले. त्यांनी केलेल्या नृत्य नाटिकांचं संगीतही खूप गाजलं.

घाशीरामशिवाय तीन पैशांचा तमाशा, गिरीबाला, ये रे ये रे पावसा, जेतेगिरी बेन चंदेरी, आषाढ का एक दिन या नाटकांनाही त्यांनी संगीत दिलं. चंदावरकर यांनी २६ जुलै २००९ रोजी अखेरचा श्वास घेतला.

**-प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार**

# माणगाव पोलिसांची तत्परता

## हरवलेल्या सहा वर्षीय रेणुकाला अवघ्या तीन तासांत दिले कुटुंबियांच्या ताब्यात

**माणगाव : बातमीदार**

माणगाव पोलिसांनी तत्परता दाखवत हरवलेल्या ६ वर्षीय रेणुकाला अवघ्या ३ तासांत कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. याबाबत सविस्तर वृत्त असे कि शुक्रवार, २४ जुलै रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास ६ वर्षीय रेणुका संतोष कोळी ही आपल्या वडिलांसोबत माणगांव येथे आली होती. मात्र, काही वेळाने ती वडिलांपासून हरवली.



दरम्यान, वैद्य हॉस्पिटलजवळील येलवे खाणावळ समोरील परिसरात एक चिमुकली एकटी फिरत असल्याचे आणि तिच्या अंगावर कुत्रे जात असल्याचे आरती येलवे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ चिमुकलीजवळ जाऊन तिची चौकशी केली. त्यावेळी ती हरवली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आरती येलवे यांनी मानवतेच्या भावनेतून चिमुकलीला जेवण दिले आणि तिला घेऊन माणगांव पोलीस ठाण्यात पोहोचल्या. याबाबत पत्रकार प्रतिक मोरे यांनाही माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन या प्रकरणात पोलिसांना सहकार्य केले.

पोलीस ठाण्यात आल्यानंतर पोलिसांनी चिमुकलीशी अत्यंत प्रेमाने संवाद साधत तिचे नाव, गाव आणि कुटुंबीयांची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, कमी वय असल्याने रेणुकाला आपले नाव आणि राहण्याचा पत्ता स्पष्टपणे सांगता येत नव्हता.पोलिसांच्या चौकशीत तिचे नाव रेणुका संतोष कोळी असल्याचे समोर आले. त्यानंतर ठाणे अंमलदार हवालदार सुरज फडतळे, प्रदीप घोडके आणि पोलीस शिपाई राकेश शिर्के यांनी उपलब्ध माहितीच्या आधारे तिच्या कुटुंबीयांचा आणि राहत्या घराचा शोध सुरू केला. हवालदार एम. एस. उभारे, पोलीस शिपाई राकेश शिर्के आणि महिला पोलीस शिपाई कोमल पवार हे पोलीस वाहनातून रेणुकाला घरी सोडण्यासाठी रवाना झाले.

रेणुका चव्हाणवाडी आदिवासीवाडी येथे राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर तिच्या मामाला सोबत घेत चव्हाणवाडी गाठली. तेथे रेणुका राहत असल्याची खात्री झाल्यानंतर शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता तिला तिचे वडील संतोष कोळी आणि आजीच्या ताब्यात सुखरूपपणे देण्यात आले. काही तासांपूर्वी पोलीस ठाण्यात शांत बसलेली रेणुका घरी पोहोचवल्यानंतर आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये आनंदाने उभी राहिली. पोलिसांच्या तत्परतेमुळे चिमुकली पुन्हा कुटुंबात आणि मित्रांमध्ये सुखरूप परतली.

# यशोधरा गोडबोले भाजप प्रदेश महिला मोर्चाच्या सचिवपदी

**माणगाव : प्रतिनिधी**

भाजपचे पक्षश्रेष्ठी यांच्या आदेशाने पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी माणगाव येथील पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या यशोधरा गोडबोले यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल गोडबोले यांना पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी लेखी कळविले आहे. यशोधरा गोडबोले यांच्या या फेरनियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

यशोधरा गोडबोले या माणगाव शहरातील भारतीय जनता पक्षाच्या कट्टर व निष्ठावंत कार्यकर्त्या आहेत. त्यांनी माणगाव शहरासह तालुक्यात, जिल्ह्यात भाजप संघटन मजबूत करण्याचे काम गेले बारा वर्षे निष्ठेने केले आहे.



पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवून त्यातून महिलांना संघटित करून पक्ष संघटना मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला आहे. माणगाव तालुका भाजप महिला मोर्चाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपल्या कार्यकाळात चांगले काम केले. त्यानंतर त्यांना प्रदेशावर काम करण्याची संधी देण्यात आली. पक्षाच्या महिला प्रदेश सचिव म्हणून यापूर्वीही त्यांनी चांगले काम करून शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ अनेकांना मिळवून दिला.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अभिप्रेत असे काम त्या करीत असल्यानेच पक्ष नेतृत्वाने पुन्हा एकदा त्यांना संधी देऊन पक्षाच्या महिला मोर्चा प्रदेश सचिवपदी त्यांची नियुक्ती केली आहे. आपल्या निवडीबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना यशोधरा गोडबोले यांनी सांगितले की,मी सर्वप्रथम पक्षश्रेष्ठींचे आभार व ऋण व्यक्त करते. या नेत्यांनी माझ्यासारख्या ग्रामीण भागातील महिलेवर विश्वास दाखवून माझी पुन्हा एकदा पक्षाच्या महिला मोर्चा प्रदेश सचिवपदी नियुक्ती केली. या नेते मंडळींचा विश्वास सार्थ ठरवून मी यापुढेही महिलांना संघटित करून पक्षाचे काम करणार आहे.

# जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे पदग्रहण व वार्षिक गुणगौरव सोहळा दिमाखात

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे गुरुवारी नुकताच 'पदग्रहण व वार्षिक गुणगौरव सोहळा' अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य मंगेश बामनोटे आणि सहशालेय उपक्रम प्रमुख अफीह बाशा यांच्या उत्तम नियोजनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून 'आरोही जे.एस.डब्ल्यू. महिला मंडळा'च्या अध्यक्षा कामिनी चंद्रा उपस्थित होत्या. तसेच सन्माननीय अतिथी प्रसिद्ध समाजसेविका नीलू मलिक, विशेष अतिथी मीनाक्षी ठाकूर, चंचल तेलंग, सुमन सिंग आणि स्नेहा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाची सुरुवात नवनिर्वाचित बाल प्रतिनिधी मंडळाच्या शिस्तबद्ध आणि रुबाबदार पथसंचलनाने झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त बालनेत्यांना सन्मानचिन्हे व पट्टे प्रदान करून कर्तव्याची शपथ देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका,



विविध नृत्यप्रकार, सुमधुर गायन आणि प्रेरणादायी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.

वार्षिक गुणगौरव सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्र, क्रीडा स्पर्धा आणि 'महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत' उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यासोबतच 'आरोही जे.एस.डब्ल्यू. महिला मंडळा'च्या सहकार्याने राबवण्यात आलेला 'गणवेश दान उपक्रम' हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले, ज्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती व सामाजिक जबाबदारीची भावना रुजवण्यात आली.

या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी दिनेश कानुगोजे, सुशील अभंगे, सबा पटवी, संचारी चॅटर्जी, उत्तरा वेंगुरलेकर यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुरूडमध्ये नेत्रतपासणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुरूड तालुक्यातील आमळी येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य मोफत नेत्रतपासणी, नेत्र शस्त्रक्रिया व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते आणि भाजप महिला जिल्हा उपाध्यक्षा ॲड. मनस्वी मोहिते यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आमळी येथील एच.पी. पेट्रोल पंपाजवळील भाजप कार्यालयात बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबिर पार पडले. शिबिराचे



उद्घाटन ॲड. महेश मोहिते व ॲड. मनस्वी मोहिते यांच्या हस्ते फीत कापून व श्रीफळ वाढवून करण्यात आले.शिबिरामध्ये शेकडो नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांची मोफत नेत्रशस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली तसेच पात्र लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील अनेक गरजू नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवेचा लाभ मिळाला.यावेळी भाजप पंचायत समिती सदस्या अश्विनी मोहनिश ठाकूर, मिठेखार ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक वाघमारे, ग्रामपंचायत सदस्या शीतल वाणी, माजी सरपंच सुवर्णा चवरकर तसेच महेंद्र चौलकर, लियाकत खोत, राजेंद्र सुतार, संदीप चिरायू, विनायक कांबळी, भतर जोशी, प्रशांत भोय, निलेश चवरकर, गणेश कट, हरेश पाटील, भारत सावंत, ओदश माळी, नितीन आर्डे, दीपक चोरडेकर यांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक (कब्जेदार) **श्री. धनाजी नारायण पाटील** यांच्याकडून खरेदी घेणेचे निश्चित झाले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचा वर्णन**

**मौजे. कोपर, ता. पेण, जिल्हा. रायगड**

| सर्व्हे | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर. चौ. मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ५४ | १ | ०-६५-९०<br>पो.ख. ०-०२-७०<br>एकूण ०-६८-६० | ९.३२ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दाण, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदील, ट्रस्ट, वारस या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहित रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही तर सदर मिळकत हि निर्वेध बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजनेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे सर्व लोकांस कळावे.

**सही:-**
**ॲड. योगेश एम तुपविहीरे**
**पत्ता- ऑफिस नं ०१, प्लॉट नं. ३८०,**
**उलवे, नवी मुंबई- ४१०२०६.**
**मो. नं - ९६५३१६७८१९**

# भाजप दक्षिण रायगड व्यापारी सेलच्या जिल्हाध्यक्षपदी सचिन मोदी; व्यापारी प्रश्न सोडविण्याला प्राधान्य

**नागोठणे : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत व सक्रिय कार्यकर्ते तसेच नागोठणेचे माजी शहराध्यक्ष सचिन मोदी यांची भाजप दक्षिण रायगड व्यापारी सेल (बिझनेस विंग) जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माजी खासदार तथा भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली असून, अलिबाग येथील भाजप जिल्हा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात आमदार प्रमोद जठार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



या कार्यक्रमास माजी खासदार भाजप रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशिल पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महिला जिल्हाध्यक्ष चित्राताई पाटील, उत्तर रायगड भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आस्वाद पाटील, ॲड. महेश मोहिते, कमळ नागरी पतसंस्थेचे संस्थापक गिरीश तुळपुळे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियुक्तीनंतर सचिन मोदी यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल ज्येष्ठ नेते सतीश धारप, जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील आणि जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांचे आभार मानत व्यापारी वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी व पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सचिन मोदी यांनी यापूर्वी नागोठणे शहराध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. एमबीए (मार्केटिंग) पदवीधर असलेले मोदी हे यशस्वी उद्योजक असून स्वदेशी उत्पादनांच्या प्रसारासाठी पतंजली समूहाशी अनेक वर्षांपासून जोडलेले आहेत. त्यांना राजकीय वारसाही लाभला असून त्यांचे काका कै. मुलचंदशेठ मोदी यांनी १९७८ मध्ये विधानसभा निवडणूक लढविली होती.

दरम्यान, सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान लक्षणीय असेच राहिले आहे. कोरोना काळातदेखील सरकारी रुग्णालयांमध्ये शेड उभारणे, खुर्च्या, पिण्याचे पाणी, अल्पोपहाराची व्यवस्था तसेच नागरिकांसाठी मोफत ऑनलाइन अर्ज सहाय्य केंद्र सुरू करून त्यांनी उल्लेखनीय सामाजिक कार्य केले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त नवघर आदर्श शाळेची बालदिंडी

**पाली : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा, नवघर येथे शनिवारी (दि. २५) भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात बालदिंडीचे आयोजन करण्यात आले. 'शिक्षण हीच वारी, वारी समतेची आणि वारी पर्यावरणाची' असा सामाजिक संदेश देत विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन काढला.

सकाळी शाळेच्या प्रांगणातून बालदिंडीला प्रारंभ झाला. विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेत सजलेले विद्यार्थी, हातात टाळ-मृदंग, भागवत धर्माचे पताके आणि सजविलेली पालखी घेऊन वारकरी रूपात सहभागी झाले होते. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' आणि 'विठ्ठल रुक्मिणी'च्या जयघोषाने नवघर परिसर दुमदुमून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारीची परंपरा जपत शिक्षण, सामाजिक समता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी घोषवाक्ये दिली. त्यामुळे बालदिंडीला सामाजिक प्रबोधनाचीही जोड मिळाली. गावातून मार्गक्रमण करत बालदिंडी नवघर येथील श्री विठ्ठल मंदिरात पोहचली.

# रसायनीत महिलेचा विनयभंग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरात एका महिलेचा विनयभंग करण्याची घटना घडली असून महिला फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात राहणारे असून एकमेकांचे परिचयाचे आहेत. फिर्यादी महिला या त्यांच्या घरातील मुलास घेवून पलंगावर बसलेल्या असताना त्यांच्या गावात राहणारा आरोपी याने फिर्यादी महिलेशी बोलण्याचा बहाणा करुन घरामध्ये येवून महिलेला तुला पाहिजे तेव्हढे पैसे देतो. सर्व वस्तू घरात आणून देईन, मटण पाठवेन, मला नाराज करू नको, असे अश्लील शब्द बोलून व महिला फिर्यादी हीस लगट करण्याचा प्रयत्न करून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले.

दरम्यान, याबाबत सदर महिलेने रसायनी पोलीस ठाण्यात विनयभंगाची नोंद केली असून आरोपी विरोधात बीएनएस कलम ७४, ७५ (२) प्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३५४(अ) नुसार नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रमोद जाधव व तपासिक अंमलदार मपोसई अनुसया ढोणे अधिक तपास करीत आहेत.




# ‘भगव्या दहशतवादा’च्या फेक नॅरेटिव्हचा पर्दाफाश





*__स्मिता प्रकाश :__ नमस्कार, 'एएनआय पॉडकास्ट'च्या आणखी एका विशेष भागात आपले स्वागत. आजचे आपले पाहुणे आहेत, केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागाचे माजी अवर सचिव आर.व्ही.एस. मणी. ते राष्ट्रीय सुरक्षाविषयक अभ्यासक आणि भाष्यकार आहेत. जून २०२६मध्ये त्यांना पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'The Myth of Hindu Terror – Insider Account of Ministry of Home Affairs (२००६–२०१०)' या पुस्तकाचे ते लेखकही आहेत. या पुस्तकात त्यांनी केंद्रीय गृहमंत्रालयात 'हिंदू दहशतवाद' किंवा ‘भगवा दहशतवाद' ही संकल्पना कशी उभी करण्यात आली याविषयीचा त्यांचा अनुभव मांडला आहे. या मुलाखतीत आपण मालेगाव बॉम्बस्फोट, कर्नल पुरोहित यांची चौकशी, इशरत जहाँ प्रकरण, बनावट नोटांचे रॅकेट, पाकिस्तानमार्गे अमली पदार्थांच्या पैशातून दहशतवादी कारवायांना होणारा निधी अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणार आहोत.*

**स्मिता प्रकाश :** नमस्कार मणीजी, आपण या पॉडकास्टमध्ये सहभागी झाल्याबद्दल तुमचे आभार आणि आपणास मिळालेल्या पद्म पुरस्काराबद्दल हार्दिक अभिनंदन! आपण राष्ट्रपतींकडून पुरस्कार पुरस्कार स्वीकारण्यासाठी चालत जात होतात, तेव्हा आम्ही सर्वजण एकाच विचारात होतो; आपण आयुष्यात किती काही सहन केले, किती काही अनुभवले. त्यामुळे मला जाणून घ्यायचे आहे की, त्यावेळी आपल्या मनात नेमके काय चालले होते?

**आर.व्ही.एस. मणी :** खरे सांगायचे तर त्या क्षणी मी अक्षरशः आनंदाच्या भरात होतो. मी पंतप्रधानांना अभिवादन करण्यासाठी पुढे जात असतानाच त्यांनी स्वतःहून माझ्याशी हस्तांदोलन केले. त्यांनी मनापासून आनंद व्यक्त केला. त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट जाणवत होते की, हा सन्मान मिळाल्याचा त्यांना वैयक्तिक आनंद झाला आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या चेहऱ्यावरसुद्धा स्मितहास्य दिसून येत होते, कारण त्या काळात साधारण १५ वर्षांपूर्वी आम्ही सर्वजण एका विशिष्ट राजकीय कथानकाचे बळी ठरलो होतो. आज त्या सर्व आरोपांतून सत्य बाहेर आले. त्यामुळे एक प्रकारचा न्याय मिळाल्याची भावना होती. माझ्या चेहऱ्यावर विजयाचे समाधान होते आणि ज्यांनी मला हा सन्मान दिला त्यांच्या चेहऱ्यावरही तेच समाधान दिसत होते.

**स्मिता प्रकाश :** अनेक वर्षे चाललेल्या एका शांत संघर्षाचे हे जणू औचित्य सिद्ध झाल्यासारखे होते. ‘हिंदू दहशतवाद' हा शब्द अनेकांसाठी केवळ एक शब्द असेल, पण प्रत्यक्षात त्याने अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. त्या काळचे गृहमंत्री नंतर म्हणाले की, 'हिंदू दहशतवाद' हा शब्द वापरणे चूक होते. त्यांनी असेही सांगितले की, त्यांच्यावर दबाव होता, पण देशाच्या सुरक्षेबाबत अंतिम जबाबदारी गृहमंत्र्यांची असते. अशा व्यक्तीने आधी "हिंदू दहशतवाद' असा उल्लेख करावा आणि नंतर दहा वर्षांनी तो दबावाखाली केल्याचे सांगावे हे गंभीर आहे. हा शब्दप्रयोग नेमका कसा निर्माण झाला? आणि त्याचे परिणाम किती गंभीर होते?

**आर.व्ही.एस. मणी :** या सगळ्याचा वैयक्तिक फटका मला मोठ्या प्रमाणावर बसला. माझ्या आईच्या प्रकृतीवर याचा अत्यंत वाईट परिणाम झाला. त्यावेळी तिचे वय ८८ वर्षे होते. वयस्कर असली, तरी ती स्वतः उठून स्वयंपाकघरात जाऊन चहा बनवू शकत होती, पण अवघ्या २७ दिवसांत त्यांची प्रकृती इतकी खालावली की, त्या पूर्णपणे अंथरुणाला खिळल्या. तो माझ्यासाठी अत्यंत वेदनादायक काळ होता.

**स्मिता प्रकाश :** हे तेच २७ दिवस होते, जेव्हा तुमची चौकशी सुरू होती?

**आर.व्ही.एस. मणी :** होय! डिसेंबर २०१३ ते २० जानेवारी २०१४ या काळात माझी चौकशी सुरू झाली होती. २४ जानेवारी रोजी माझ्या आईचे निधन झाले. माझ्या वडिलांनाही या सगळ्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत गेली. ते जवळजवळ निष्क्रिय अवस्थेत गेले आणि साधारण अकरा–बारा महिन्यांनंतर त्यांचेही निधन झाले, मात्र माझी कथा बाजूला ठेवली, तरी मला कर्नल पुरोहित यांच्या पत्नी अर्पणा पुरोहित यांची गोष्ट आठवते. पहिल्याच दिवसापासून मी सातत्याने सांगत आलो आहे की, हे संपूर्ण प्रकरण खोटे आहे.

**स्मिता प्रकाश :** मालेगाव प्रकरण?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, मालेगाव प्रकरण! २९ सप्टेंबरला (२००८) स्फोट झाला. त्याच्या अवघ्या काही दिवसांत; दसऱ्याच्या सुट्ट्या धरल्या, तर प्रत्यक्षात चारच कामकाजाचे दिवस झाले होते. 'एटीएस'ने निष्कर्ष काढला की, हा दहशतवादी हल्ला आहे. त्यानंतर प्रकरण 'एटीएस'कडे वर्ग करण्यात आले, पण एवढ्या कमी कालावधीत सर्व पुरावे तपासून असा निष्कर्ष काढणे वास्तववादी वाटत

**भाग–१**

नाही. उलट, असे वाटत होते की, आधीच एक ठरलेली पटकथा तयार होती आणि तपास त्याच दिशेने नेला जात होता.

**स्मिता प्रकाश :** 'ते' म्हणजे नेमके कोण ?

**आर.व्ही.एस. मणी :** त्या काळात केंद्र आणि महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी एकाच पक्षाचे सरकार होते. जबाबदारी नेमकी कोणाची होती, हे मी ठामपणे सांगू शकत नाही. मुख्यमंत्र्यांनी स्वतः निर्णय घेतला होता की, ते फक्त आदेशांचे पालन करत होते, हे आता तेच सांगू शकतील, पण एक गोष्ट निश्चित आहे या सर्व घडामोडींमागे राजकीय स्तरावर निर्णय झाले होते. जुलै २००६मध्ये मुंबईत मालिकाबद्ध बॉम्बस्फोट झाले. त्या प्रकरणात महाराष्ट्र 'एटीएस'ला आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक करण्यासाठी तब्बल सात महिने लागले, पण २००८च्या मालेगाव प्रकरणात दिवसांत संपूर्ण तपास पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला. इतकेच नव्हे, माझ्या मते, कर्नल पुरोहित यांना प्रत्यक्ष दाखवलेल्या तारखेच्या आधीच ताब्यात घेण्यात आले होते. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, त्या काळात भटकल आणि कर्नाटकचा किनारपट्टी (कोस्टल कर्नाटक) भाग हा 'इंडियन मुजाहिद्दीन'चा प्रमुख अड्डा बनत असल्याची माहिती आमच्याकडे होती. ही बाब सर्वप्रथम कर्नल पुरोहित यांनीच विविध गुप्तचर अहवालांतून अधोरेखित केली होती. त्यावेळी हे अहवाल नेमके कोण तयार करत आहे हे मला माहिती नव्हते. नंतर कर्नल बक्षी यांच्याशी चर्चा झाली, तेव्हा त्यांनी सांगितले की, त्या गुप्तचर माहितीमागे तेच होते. ते मला आवश्यक गुप्तचर माहिती पुरवत असत आणि त्या माहितीवर पुढील प्रशासकीय कारवाई करण्याची जबाबदारी माझी होती. याच काळात 'आयएसआय'च्या हालचाली, त्यांचे विविध नेटवर्क आणि दहशतवादाचे आरोप ठेवण्यात आले.

‘अभिनव भारत' या संस्थेकडेही याच संदर्भात पाहण्याची गरज आहे. १९५३मध्ये ही संस्था निष्क्रिय झाली होती. 'यूपीए' सरकार सत्तेत आल्यानंतर ही संस्था पुन्हा सक्रिय करण्यात आली. यानंतर विविध उजव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना या संस्थेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. संस्थेचा विस्तार करण्यात आला, निधी उभा करण्यात आला आणि नंतर याच संस्थेचा वापर करून संपूर्ण कथानक उभे करण्यात आले. महाराष्ट्रात एखादी धर्मादाय संस्था पुन्हा सुरू करायची असेल, तर धर्मादाय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. राज्यात काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते. राजकीय मान्यता मिळाल्याशिवाय अशी



भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न याविषयी मोठ्या प्रमाणात माहिती जमा होत होती. महाराष्ट्र ही त्या प्रयोगाची जणू प्रयोगशाळाच बनली होती. मालेगावच्या दोन्ही स्फोटांमागे 'अहल–ए–हदीस'चा असल्याची माहिती सातत्याने समोर येत होती. आम्ही वारंवार सांगत होतो की, या स्फोटांमागे ' अहल–ए– हदीस'चा हात आहे, परंतु त्या सर्व माहितीची दखल घेतली गेली नाही. त्याऐवजी हिंदूंना अटक करण्यात सहभाग आली आणि त्यांच्यावर परवानगी त्या काळात मिळणे शक्यच नव्हते. म्हणूनच माझ्या मते, ही संस्था जाणीवपूर्वक पुन्हा पुन्हा सुरू करण्यात आली. त्यानंतर काही लोकांना त्यामध्ये सहभागी करून शेवटी त्यांनाच आरोपी बनवण्यात आले. हा संपूर्ण प्रकार नियोजनबद्ध होता.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे तुमच्या मते, हे सर्व आधीपासूनच ठरवून गेले होते?

**आर.व्ही.एस. मणी :** त्यांना २४ तास मारहाण करण्यात आली. या संदर्भात अनेक तक्रारी केंद्रीय गृहमंत्रालयाकडे पाठवण्यात आल्या. त्या तक्रारी गृहमंत्रालयाच्या मानवाधिकार विभागाकडे पोहचल्या, मात्र त्या विभागाकडे केवळ मानवी हक्कांचा प्रश्न म्हणून त्यांची नोंद झाली. दहशतवादाच्या खोट्या आरोपांचा मुख्य मुद्दा मात्र दुर्लक्षित राहिला. आजही कर्नल पुरोहित जिवंत आहेत आणि चालू शकतात, हेच त्यांच्या सहनशक्तीचे द्योतक आहे.

**स्मिता प्रकाश :** ‘थर्ड डिग्री’चा वापर केला जात असेल तर त्याला कुणाची तरी परवानगी असते. त्याची नोंदही असते. मग एका अधिकाऱ्याला अशा प्रकारे 'एटीएस'च्या ताब्यात कसे देण्यात आले? भारतीय लष्कराने याला विरोध का केला नाही?

**आर.व्ही.एस. मणी :** हाच सर्वांत मोठा प्रश्न आहे. त्यावेळी कर्नल पुरोहित पचमढी येथे प्रशिक्षण घेत होते. तेथून त्यांना दिल्लीला जायचे होते. तेथून त्यांना दिल्लीला जाण्याची 'मूव्हमेंट ऑर्डर' देण्यात आली, मात्र भोपाळला पोहोचल्यावर त्यांची 'मूव्हमेंट ऑर्डर' बदलण्यात आली. त्यांना सांगण्यात आले की, त्यांना आता दिल्लीऐवजी मुंबईला जायचे आहे. मुंबई विमानतळावर उतरल्यावर त्यांना थेट महाराष्ट्र 'एटीएस'च्या ताब्यात देण्यात आले. माझ्या आकलनाप्रमाणे एखाद्या कार्यरत लष्करी अधिकाऱ्याविरुद्ध अगदी किरकोळ पुरावे असले, तरी संबंधित 'जीओसी' (General Officer Commanding) आणि लष्कराच्या वरिष्ठ पातळीवरील अनेक अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक असते. किमान २५ ते २६ स्तरांवर त्या पुराव्यांची तपासणी केली जाते. त्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय एखाद्या अधिकाऱ्याला अटक होऊ शकत नाही, परंतु या प्रकरणात तसे काहीच झाले नाही. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत गुप्तपणे पार पाडण्यात आली. कर्नल पुरोहित हे यापूर्वी 'एटीएस'च्या अधिकाऱ्यांना गुप्तचर माहिती कशी गोळा करावी याचे प्रशिक्षण देत होते. त्यावेळी के.पी. रघुवंशी 'एटीएस'चे प्रमुख होते. नंतर त्याच 'एटीएस'मधील काही अधिकाऱ्यांनी कर्नल पुरोहित यांच्यावर अत्याचार केले. फरक इतकाच होता की, त्या वेळेपर्यंत नेतृत्व बदलले होते. आम्ही त्यांना आधीच इशारा दिला होता की, त्यांनी काही अत्यंत संवेदनशील बाबींना हात घातला आहे. दुर्दैवाने तो इशारा खरा ठरला.

**(क्रमशः)**

---

# पावसाळी मासेमारी बंदीचे उल्लंघन; वाशी खाडीत मासेमारी नौकेवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी खाडीत पावसाळी मासेमारी बंदीचे उल्लंघन करणाऱ्या एका मासेमारी नौकेवर मत्स्यव्यवसाय विभागाने नियमानुसार कारवाई केली आहे. स्थानिक मच्छिमारांमार्फेत वाशी खाडीत ट्रॉलर नौका अनधिकृतरित्या मासेमारीसाठी आल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रेरणा देशभ्रतार (भा. प्र.से),आयुक्त तसेच महेश देवरे, अतिरिक्त आयुक्त तथा सहआयुक्त (सागरी) व नागनाथ भादुले, प्रादेशिक उपआयुक्त, मुंबई विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



दि. २० जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काळे, परवाना अधिकारी, उत्तन यांनी वाशी जेट्टी येथील सुरक्षारक्षक यांच्यासह घटनास्थळी पाहणी केली. मात्र, रात्री ओहोटी असल्याने आणि संबंधित नौकेपर्यंत पोहोचण्यासाठी कोणतीही नौका उपलब्ध नसल्याने रात्रीभर संशयित नौकेवर पाळत ठेवण्यात आली. त्यानंतर दि.२१ जुलै रोजी स्थानिक मच्छिमारांची नौका उपलब्ध होताच सुरक्षा रक्षक आणि नवी मुंबई सागरी सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांसह मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली.

यावेळी, हृषीकेश खंडू कोळी (रा. नवापाडा, करंजा) यांच्या मालकीची 'आई द्रोणागिरी भोले' (IND–MH–७–MM–४०८९) ही मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधीचे उल्लंघन करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ (सुधारणा २०२१) अंतर्गत संबंधित नौकेवर नियमानुसार कारवाई करण्यात आली असून, सदर नौका अवरुद्ध करण्याबाबतची नोटीस नौकामालकास बजावण्यात आली आहे.

तसेच पुढील आदेशापर्यंत ही नौका वाशी ब्रिज जेट्टी बंदरात अवरुद्ध ठेवण्यात येणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने दिली. तसेच या प्रकरणाचा सविस्तर प्रतिवृत्त सहाय्यक आयुक्त तथा अभिनिर्णय अधिकारी, ठाणे यांच्याकडे शीघ्रगतीने सादर करण्यात येणार असून, पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

# शाळेत अवतरली ‘विठ्ठलनामाची’ आषाढी वारी

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी एकादशी आणि वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेची जिवंत ओळख आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांच्या विचारांनी समृद्ध झालेल्या वारकरी संप्रदायातून समता, भक्ती, सेवा, पर्यावरण संवर्धन आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला जातो. याच संत परंपरेची ओळख आणि आषाढी वारीचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजावे, या उद्देशाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ११७ व ०२, दिवाळे कोळीवाडा येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी दिंडी, रिंगण आणि वृक्षदिंडी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल–रखुमाई, वारकरी, टाळकरी आदी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय केला. "विठ्ठलनामाची शाळा भरली.","पाऊले चालती पंढरीची वाट.", "चंद्रभागेच्या तिरी." अशा अभंग, भजन आणि गीतांनी वातावरण विठ्ठलमय झाले.

एरवी गणवेशात दिसणारी चिमुकली मुले आज पांढरा झब्बा, डोक्यावर गांधी टोपी, कपाळी बुक्का आणि गळ्यात टाळ तर मुली नऊवारी साडी, केसात गजरा व डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन बालवारकरी



बनल्या होत्या. "विठ्ठलनामाची शाळा भरली, शाळा शिकताना तहानभूक हरली" या अभंगाचा प्रत्यय देत ज्ञानाच्या मंदिरात हरिनामाचा अखंड गजर घुमला आणि संपूर्ण शाळा भक्तीरसात न्हाऊन निघाली.

मुख्याध्यापिका सुहासिनी लोंढे आणि शोभा कुदळे यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा तसेच संतांच्या शिकवणीतून मानवता, समता, सदाचार आणि सेवाभावाचे महत्त्व समजावून सांगितले.

---

# वीर नारी व शहीद कुटुंबांचा वाशीत होणार गौरव

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

देश रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या अमर शहिदांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या वीर परिवार व माता–पित्यांचा गौरव करण्यासाठी 'वीर जवान फाऊंडेशन'च्या वतीने येत्या २६ जुलै रोजी विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात सायंकाळी ६ वाजता हा सोहळा रंगणार आहे.

मागील ९ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमाचे यंदा १० वे वर्ष आहे. यावर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आमंत्रित करण्यात आलेल्या वीर नारी आणि शहीद सैनिकांच्या पालकांना शौर्य वारसा शिष्यवृत्ती अंतर्गत प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पद्मश्री शंकर महादेवनआणि त्यांचे सहकारी कलाकार आपल्या सुरांच्या माध्यमातून अमर शहिदांना राष्ट्रभक्तीपर गीतांची भावपूर्ण संगीतमय श्रद्धांजली अर्पण करणार आहेत. या सोहळ्यास वीर जवान फाऊंडेशनचे संस्थापक विजय नाहटा (आयएएस निवृत्त) भारतीय सेनेचे वरिष्ठ अधिकारी, आजी–माजी सैनिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पर्यावरणवादी बी. एन. कुमार यांना पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरणवादी, ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक बी. एन. कुमार (बीएनके) यांना त्यांच्या "पॉलिट्रिक्स इन इंडिया अ थर्ड अंपायर व्ू ऑफ लीडर्स प्ले" या पुस्तकासाठी इंडियन लिटरेचर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

बंगळुरूस्थित वेयिल फाउंडेशनतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार कुमार यांच्या राजकीय लेखनातील योगदानाची तसेच भारताच्या लोकशाही आणि राजकीय व्यवस्थेवरील त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीची दखल म्हणून प्रदान करण्यात आला आहेपुरस्काराच्या प्रशस्तिपत्रात म्हटले आहे की, पत्रकारिता, जनसंपर्क आणि डिजिटल माध्यमांतील कुमार यांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे या पुस्तकात भारतीय राजकारण, नेतृत्व आणि प्रशासनाचा व्यावहारिक दृष्टिकोनातून वेध घेण्यात आला आहे.आपल्या कारकिर्दीत कुमार यांनी वार्ताहर, संपादक, स्तंभलेखक, अशा विविध भूमिका पार पाडल्या आहेत.

# तळोजा पोलिसांकडून ४४ तासांत खुनाचा गुन्हा उघड; आरोपीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलिसांनी खुनाच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या ४४ तासांत छडा लावत गुजरातमधून आरोपीला अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण, साक्षीदारांचे जबाब आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जुलै २०२६ रोजी रात्री नितलस गावातील "निशा ट्रान्सपोर्ट" कंपनीच्या वर्कशॉपमध्ये चालक चंदन कपिलमुनी पांडे आणि रमेशकुमार स्वामीनाथ यादव यांच्यात जुन्या वादातून भांडण झाले होते. त्यानंतर २४ जुलै रोजी पहाटे ४.३० ते ५.०० वाजण्याच्या दरम्यान पुन्हा झालेल्या वादात आरोपीने चंदन पांडे यांच्या डोक्यावर अवजड हत्याराने



वार करून गंभीर जखमी केले. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक मोहम्मद आलम हनीफुल खान यांच्या फिर्यादीवरून तळोजा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी गुजरातमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर सपोनि. निलेश येवले व त्यांच्या पथकाने गुजरातमधील बलसाड रेल्वे स्थानक परिसरातून आरोपीला ताब्यात घेतले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ४४ तासांत आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

ही कारवाई पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर निकम, सपोनि. अजय शिंदे, सपोनि. निलेश येवले, सपोनि. सागर शिंगटे, पोउपनि. ज्ञानोबा धुळकुंडे, पोउपनि. सिद्धेश शिंदे तसेच तळोजा पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# दिघी बंदर-सुरूर ग्रीनफिल्ड महामार्गाचा प्रस्ताव; कोकणच्या विकासाला नवी गती मिळणार!

## पोलादपूरमार्गे पश्चिम महाराष्ट्राशी थेट संपर्क; प्रवासाचा वेळ कमी, उद्योग-पर्यटनाला मोठी चालना

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणच्या विकासाचा चेहरामोहरा बदलणारा आणि रायगडसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा ठरणारा दिघी बंदरपोलादपूर सुरूर ग्रीनफिल्ड महामार्ग उभारण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) पुढे आणला आहे. सुमारे १४० किलोमीटर लांबीच्या या नव्या महामार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) आणि व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, या प्रकल्पामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील दळणवळणाला ऐतिहासिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



हा महामार्ग दिघी बंदर, पोलादपूर आणि सुरूर (राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८) यांना जोडणार आहे. त्यामुळे कोकणातील बंदरांपर्यंत मालवाहतुकीसाठी जलद आणि पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. विशेषतः दिघी बंदराच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून, औद्योगिक गुंतवणूक, निर्यात, पर्यटन आणि स्थानिक रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. आज मुंबईगोवा महामार्ग आणि महाबळेश्वर घाटमार्गावरील वाढती वाहतूक, वारंवार होणारी कोंडी आणि अपघात लक्षात घेता हा नवा महामार्ग पर्यायी मार्ग म्हणून महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे कोकणातून पुणे, सातारा आणि पश्चिम महाराष्ट्रात जाणाऱ्या प्रवाशांचा वेळ, इंधन आणि वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर परिसराच्या विकासालाही नवे दालन खुले होणार आहे. पर्यटनस्थळे, कृषीमाल, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक उद्योगांना देशांतर्गत बाजारपेठेशी अधिक वेगवान संपर्क मिळेल. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा आधार मिळण्याची शक्यता आहे. सध्या हा प्रकल्प प्रस्ताव आणि डीपीआर तयार करण्याच्या टप्प्यात असून, त्यानंतर अंतिम मंजुरी, भूसंपादन आणि बांधकामाची प्रक्रिया सुरू होणार आहे. कोकणातील नागरिक, व्यापारी आणि उद्योग क्षेत्राकडून या महत्त्वाकांक्षी महामार्ग प्रकल्पाकडे मोठ्या आशेने पाहिले जात आहे.

## माथेरानमधील घोड्यांबाबत आराखडा सादर करा; राष्ट्रीय हरित लवादाचे माथेरान नगरपरिषदेला निर्देश

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमधील घोड्यांची संख्या,तबेल्यांचे स्थलांतरण आणि विष्ठा व्यवस्थापनाबाबत सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने माथेरान नगरपरिषदेला दिले आहेत.येथीलसामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे आणि केतन रमाणे यांनी या संदर्भातील याचिका दाखल केली आहे.या याचिकेवरील सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंह यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या सुनावणीत हे आदेश देण्यात आले आहेत.



माथेरानमधील घोड्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि त्यांच्या मलमूत्रामुळे येथील पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचा अहवाल पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन समितीने दिला आहे.या समितीने माथेरानमधील घोड्यांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी करणे,घोड्यांचे तबेले पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर स्थलांतरित करणे,जलस्त्रोतांचे संरक्षण करणे,घोड्यांच्या मार्गांचे नियोजन करणे आणि तीन ते पाच वर्षं सातत्याने निरीक्षण करून पडताळणी करणे असे उपाय सुचविण्यात आले होते.त्यानुसार माथेरान नगरपरिषदेने घोड्यांच्या विष्ठा व्यवस्थापनासाठी त्या संदर्भात राष्ट्रीय हरित लवादासमोर एक प्रतिज्ञापत्र दाखल केले होते.ज्यात असे नमूद केले होते की हरित लवादाने मालवाहतुकीसाठी आणि घोड्यांच्या विष्ठा व्यवस्थापनासाठी ई-टेम्पो वापरण्यास परवानगी दिल्यास मालवाहतूक करणाऱ्या घोड्यांची संख्या कमी करता येऊ शकेल असे म्हटले होते.यावर घोड्यांची विष्ठा कुठे नेली जाणार,त्यावर कोणती प्रक्रिया होणार,घोड्यांची संख्या कशी कमी होणार, तबेले कुठे हलविण्यात येणार,घोड्यांचे मार्ग निश्चित कसे करणार याचा नगरपरिषदेने तपशील दिला नसल्याबाबत हरित लवादाच्या न्यायाधिकरणाने नाराजी व्यक्त केली.त्यामुळे या संदर्भात सविस्तर कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## एकदरा-मुरूड खाडीतील मासेमारी हंगामापूर्वी गाळ काढण्यासाठी मुरूड तहसीलदारांना निवेदन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड एकदरा येथील मासेमारी करणारे मच्छीमार कोळी बांधव आपल्या बोटी खाडी जवळील समुद्रात नांगर टाकून उभ्या करत असतात.परंत दिवसेंदिवस खाडीतील गाळ वाढत चालल्याने कोळी मच्छीमार बांधवांना बोटी काढण्यास अडथळा होत आहे.आता मच्छीमारांचा पावसाळी बंदी कालावधी १५ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्यानंतर मासेमारी हंगाम सुरू होणार आहे. तद्पूर्वी हा गाळ मासेमारी हंगामापुर्वी काढुन द्यावा अशी मागणी मुरूड सागर कन्या मच्छीमार सोसायटीच्या वतीने मुरूड तहसीलदारा कडे यांना निवेदन व्दारे करण्यात आली आहे.



निवेदनात असं म्हटलं आहे की,आमच्या एकदारा-मुरुड खाडी मध्ये केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत ग्रोयन्स बंधारा व खाडीतील गाळ काढणे या कामाला मंजुरी असून सदर काम हा ग्रोइन्स बंधारा चे चालू केले होते. परंतु काम अर्धवट असल्यामुळे खाडीमध्ये पावसाळ्याच्या प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणात खाडीच्या चॅनल मध्ये गाळ साचला आहे.सदर गाळ साचल्यामुळे खाडीच्या चॅनलमध्ये मासेमारी बोटिंचे एक्सीडेंट होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे.तसेच गाळ साचल्या मुळे नौकांचे येणे जाणे बंध होण्यास नाकारता येणार नाही.

तरी सदर खाडी क्षेत्रातील गाळ काढणे तातडीने आवश्यकता आहे अन्यथा मासेमाला सीजन अडचणीत येणार असल्याची तक्रार आमच्या चार सोसायटीच्या मच्छीमार बांधवांकडून आम्हाला तक्रार प्राप्त झाली असल्या मुळे खाडीतील सदर गाळ काढून टाकण्याची व्यवस्था आपल्याकडून व्हावी अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.निवेदन देतेवेळी मुरूड सागर कन्या मच्छीमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु,प्रकाश सरपाटील, सुरेंद्र मकु, पांडुरंग आगरकर आदिंसह कोळी बांधव उपस्थित होते.

## मंत्री असलो तरी बल्क ड्रग पार्कविरोधात जनतेसोबत ठाम उभा राहीन -मंत्री भरत गोगावले

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावरोहा तालुक्यात प्रस्तावित बल्क ड्रग पार्कविरोधात उभारलेल्या जनआंदोलनाला शनिवारी महत्त्वाचे वळण मिळाले. बल्क ड्रग पार्कविरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांची भेट घेऊन नागरिकांच्या भावना, भीती आणि मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी सुमारे २१ गाव-वाड्यांतील २५० ते ३०० नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नागरिकांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यानंतर मंत्री भरतशेठ गोगावले यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, "मी मंत्री असलो तरी सर्वप्रथम तुमच्यातलाच माणूस आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणारा, पर्यावरणाला धोका निर्माण करणारा कोणताही प्रकल्प होऊ देणार नाही. जनतेच्या हिताशी तडजोड केली जाणार नाही. मी तुमच्या संघर्षात कायम तुमच्या पाठीशी उभा राहीन." यावेळी त्यांनी सांगितले की, या विषयाची गंभीर दखल घेऊन खासदार सुनील तटकरे, उद्योगमंत्री उदय सामंत आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मुंबई येथे लवकरच उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात येईल. त्या बैठकीत नागरिकांच्या सर्व मागण्या मांडून योग्य तो निर्णय घेण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच, भविष्यात कोणताही औद्योगिक प्रकल्प उभारला गेला तर स्थानिक भूमिपुत्रांना किमान ८० टक्के रोजगारात प्राधान्य मिळावे, यासाठीही शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल. मात्र आरोग्यासाठी हानिकारक,प्रदूषण वाढविणारा किंवानागरिकांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम करणारा कोणताही उद्योग परिसरात येऊ दिला जाणार नाही.

# रायगड जिल्ह्यात आषाढी एकादशीचा उत्साह; गावागावांत दिंड्या, पालख्या

**धाटाव : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या २०९ शाळांमध्ये तसेच गावागावांत, वाड्या-वस्त्यांवर भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच टाळ-मृदुंगाचा निनाद, अभंग-भजनांचा स्वर आणि "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल", "विठ्ठल... विठ्ठल..." या अखंड नामघोषाने संपूर्ण तालुका विठ्ठलमय झाला.

रोहा तालुक्यातील घोसाळे, धाटाव, चणेरा, सुतारवाडी, वरसे, चिल्हे, वरसगाव, मेढा, खांब, महादेववाडी, न्हावे, भाले यासह अनेक गावांमध्ये पारंपरिक दिंडी, पालखी मिरवणुका आणि हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. वारकरी वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी, हातात भगव्या पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन आणि मुखी विठ्ठलनाम घेऊन दिंडीत सहभागी झाले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, महिला भजनी मंडळे आणि ग्रामस्थांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

रायगड जिल्हा परिषद शाळांमधून काढण्यात आलेल्या दिंड्यांनी गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केले. अनेक ठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीवर पुष्पवृष्टी करून स्वागत केले. मंदिरांमध्ये सामूहिक आरती, हरिपाठ, अभंग गायन, कीर्तन आणि भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी विठ्ठल भक्तीत तल्लीन होत वारी परंपरेचे दर्शन घडविले.

यावेळी विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी आणि वारकरी यांच्या वेशभूषेतून संत परंपरेचा संदेश दिला. शाळांमध्ये संत साहित्य, वारकरी संप्रदाय, समता, बंधुभाव, सेवा आणि संस्कार याविषयी माहिती देण्यात आली.

त्यामुळे हा उपक्रम केवळ धार्मिक न राहता विद्यार्थ्यांच्या संस्कारांची जपणूक करणारा ठरला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण रोहा तालुक्यात भक्ती, एकात्मता आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले.



**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात आषाढी एकादशी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृती, संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत, या उद्देशाने विद्यालयात विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. मुख्याध्यापक संतोष कदम, शालेय छात्रसंसद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते पूजन संपन्न झाले. त्यानंतर विद्यालयातून पारंपरिक दिंडी काढण्यात आली. टाळ, मृदुंग आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजरात विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" अशा जयघोषांनी संपूर्ण विद्यालय परिसर भक्तिमय झाला होता.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली वारकरी संप्रदायाची पारंपरिक वेशभूषा. अनेक विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच वारकरी यांची वेशभूषा परिधान करून संत परंपरेचे जिवंत दर्शन घडविले. पारंपरिक पोशाखामुळे कार्यक्रमाला आगळेवेगळे सौंदर्य लाभले.

यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी हरिपाठ, अभंग, भजन आणि नामसंकीर्तनाचे सुस्वर गायन सादर केले. "जय जय राम कृष्ण हरी", "ज्ञानोबा माऊली तुकाराम", "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी" यांसारख्या अभंगांनी वातावरण अधिकच भक्तिमय झाले. विद्यार्थ्यांनी संतांच्या शिकवणीतील समता, बंधुता, सेवा, सदाचार आणि मानवतेचे महत्त्वही आपल्या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडले.

यावेळी मुख्याध्यापक संतोष कदम यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगितले.

**माणगाव :** माणगाव येथील सुधाकर नारायण शिपुरकर विद्यालय आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम विद्यालयात आषाढी एकादशीचा पवित्र सोहळा अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात मोठ्या श्रद्धेने साजरा करण्यात आला. संतांच्या परंपरेचा, वारकरी संप्रदायाच्या संस्कारांचा आणि भक्तीचा अमूल्य वारसा बालमनात रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनाला अक्षरशः स्पर्श केला.



लहान विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून साकारलेली रूपे सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. निरागस चेहऱ्यांवर ओसंडून वाहणारी भक्ती, हातात भगवे पताके, गळ्यात तुळशीच्या माळा आणि कपाळावर गंधाचा टिळा अशा वेशभूषेमुळे शाळेचा परिसर जणू छोट्याशा पंढरपुरातच परिवर्तित झाला होता. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "विठ्ठल... विठ्ठल..", "रामकृष्ण हरी..", "ज्ञानोबा-तुकोबा..", "माऊली..माऊली." अशा अखंड नामस्मरणात दिंडी व पालखी मिरवणूक काढली. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला. प्रत्येक पावलागणिक भक्तीचा उत्साह आणि विठुरायावरील अपार श्रद्धा अनुभवायला मिळत होती. वारकरी परंपरेतील प्रेम, समता आणि बंधुभावाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी एकमेकांना प्रेमाने आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकी, प्रेम आणि भक्ती यांचे महत्त्व या उपक्रमातून बालमनात रुजविण्यात आले. उपस्थित पालक, शिक्षक आणि नागरिकांनीही या भावस्पर्शी क्षणांचा मनापासून आनंद घेतला.

**कर्जत :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही कडाव येथील शिशु मंदिरच्या वतीने बालगोपाळांची पारंपरिक दिंडी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात काढण्यात आली.



विठ्ठलनामाच्या गजरात, टाळ, चिपळ्यांच्या निनादात आणि अभंग, भजनांच्या सुरावटीत परिसर भक्ति रसाने न्हाऊन निघाला.शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कुडे आणि मुख्याध्यापिका अंजली मंगेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली शिशु मंदिर कडाव ते बालदिगंबर गणपती मंदिर या मार्गावर ही दिंडी काढण्यात आली. दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी आणि वारकरी संप्रदायाचा पारंपरिक वेश परिधान करून हाती वीणा, टाळ आणि भगवे ध्वज घेत विठ्ठलनामाचा अखंड गजर केला. लहानग्या बालवारकऱ्यांचा उत्साह, शिस्त आणि भक्तिभाव पाहून उपस्थित नागरिकही भारावून गेले. दिंडीमध्ये शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका पुष्पा मोहिते, अर्चना भोसले, करुणा तांडेल, माया गंगावणे, भाग्यश्री म्हात्रे, सोनाली पवार, रूपाली थोरवे, प्रगती कडव, पुनम गायकर, माया अंकुश गंगावणे तसेच शिक्षकेतर कर्मचारी सुशीला गायकर, उर्मिला गायकर आणि मधुरा ठोंबरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. याशिवाय विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिंडीत सहभागी झाले.

बालदिगंबर गणपती मंदिर परिसरात विठ्ठल, रुक्मिणीची आरती करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे विठ्ठलनामाचा गजर करत भक्तिमय वातावरण अनुभवले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. आनंद, उत्साह आणि अध्यात्मिक संस्कारांची सांगड घालत हा दिंडी सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

**माथेरान :** आषाढी एकादशी निमित्त माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या आयोजनातून ज्ञानदिंडी सोहळा मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात संपन्न झाला.आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर शाळा आणि विविध सांस्कृतिक संस्थांच्या वतीने 'ज्ञानदिंडी' सोहळ्याचे अतिशय भक्तिमय आणि उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते.



अध्यात्माची जोड देत शिक्षणाचे आणि विचारांचे महत्त्व समाजात रुजवावे,या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते अंगणवाडीतील मुलांनी विठ्ठल-रुक्मिणी,वारकरी,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम आणि संत जनाबाई यांचे रूप परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.टाळ-मृदंगाचा गजरः"विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" आणि "ज्ञानोबा माऊली तुकाराम" च्या गजराने संपूर्ण माथेरान परिसर दुमदुमून गेला होता.केवळ धार्मिक सोहळा न ठेवता दिंडीमध्ये 'झाडे लावा, झाडे जगवा','प्लास्टिक मुक्ती', 'मुली वाचवा, मुली शिकवा' आणि 'ग्रंथ हेच आमचे गुरु' अशा विविध सामाजिक संदेश देणाऱ्या पाट्या आणि फलक घेऊन विद्यार्थी सहभागी झाले होते.दिंडीच्या मार्गावर विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभंग गायले आणि फुगड्यांचा आनंद लुटला."ज्ञानोबा-तुकाराम" च्या नामघोषात आणि रिंगण सोहळ्यात तल्लीन झालेले विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामुळे संपूर्ण परिसरात पंढरपूरच्या वारीचाच भास होत होता.अश्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यां मध्ये भारतीय संस्कृती,परंपरा,सामाजिक भान आणि वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होत असते.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६

# भारताने पदकाचे खाते उघडले

## झंडू कुमारला पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये कांस्यपदक




**ग्लासगो : वृत्तसंस्था**

भारताने २०२६च्या राष्ट्रकुल खेळांच्या दुसऱ्या दिवसाचा शेवट एका पदकासह आणि अनेक दमदार कामगिरींसह केला. झंडू कुमारने पॅरा पॉवर पॅरालिफ्टिंगमध्ये कांस्यपदक जिंकून ग्लासगो येथे भारताच्या पदकतालिकेचे उद्‌घाटन केले. भारतीय खेळाडूंनी जलतरण, बॉक्सिंग आणि लॉन बाऊल्समध्येही चांगली कामगिरी केली.

पुरुषांच्या हेवीवेट पॅरा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदक जिंकून झंडू कुमारने भारताला पहिले पदक मिळवून दिलले. या २८ वर्षीय खेळाडूने १८१ किलो आणि १९० किलो वजन यशस्वीरित्या उचलून १३०.९ गुण मिळवले. तो निर्णायक १९६ किलोचा प्रयत्न पूर्ण करू शकला नाही. या स्पर्धेतील भारताचा दुसरा खेळाडू सुधीर होता, जो ११४.१ गुणांसह सहाव्या स्थानावर राहिला. नायजेरियाच्या इद्रिस रिलुवानने १३२.८ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. मॅथ्यू हार्डिंगने १३१ गुणांसह रौप्यपदक पटकावले.

पुरुषांच्या लाईटवेट पॅरा-पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे पदक थोडक्यात हुकले. अशोक मलिक १४३.८ गुणांसह चौथ्या स्थानी राहिला. इंग्लंडच्या मार्क स्वानने १५३.९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. नायजेरियाच्या रोलँड इझुरुइकेने रौप्यपदक, तर मलेशियाच्या बोनी बुन्याओ गुस्टिनने कांस्यपदक पटकावले. भारताचा परमजीत कुमार १३५.६ गुणांसह सातव्या स्थानी राहिला.

पुरुषांच्या १०० मीटर फ्रीस्टाइल एस१३ अंतिम फेरीत कार्तिक बुडिनीगिना चौथ्या स्थानी राहिल्याने भारत आणखी एक पदक जिंकण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता. बुडिनीगिनाने आपली फेरी ५७.५७ सेकंदात पूर्ण केली, तर त्याचा सहकारी इमाम अली १:०३.७३ वेळेसह सातव्या स्थानी राहिला. भारतीय बॉक्सर जादुमणी सिंगने पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात विजयी सुरुवात केली. त्याने अंतिम ३२ च्या फेरीत स्कॉटलंडच्या ॲरॉन कलनला पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. जादुमणी सिंगला एकमताने विजेता घोषित करण्यात आले. आता त्याचा सामना पाकिस्तानच्या सुमामा रहमानशी होईल.

श्रीहरी नटराजचा प्रवास उपांत्य फेरीतच संपला. जलतरणात या भारतीय जलतरणपटूने पुरुषांच्या ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात सातवे स्थान पटकावले. नटराजने आपली हीट २५.२९ सेकंदात पूर्ण केली आणि तो अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही.

### पंतप्रधान मोदींकडून अभिनंदन

भारताने २०२६ च्या राष्ट्रकुल खेळांच्या दुसऱ्या दिवसाचा शेवट एका पदकासह आणि अनेक दमदार कामगिरींसह केला. झंडू कुमारने पॉवर पॅरालिफ्टिंगमध्ये कांस्यपदक जिंकून ग्लासगो येथे भारताच्या पदकतालिकेचे उद्‌घाटन केले. भारतीय खेळाडूंनी जलतरण, बॉक्सिंग आणि लॉन बाऊल्समध्येही चांगली कामगिरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी २०२६च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकल्याबद्दल भारतीय पॅरा-पॉवरलिफ्टर झंडू कुमारचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

**लॉन बाऊल्समध्ये दमदार कामगिरी**

लॉन बाऊल्समध्ये भारतासाठी हा आणखी एक प्रभावी दिवस होता. रूपा राणी तिर्की आणि पिंकी सिंग यांच्या महिला जोडीने आपला सलग दुसरा विजय नोंदवला. स्कॉटिश इव्हेंट कॅम्पस हॉल ३ येथे झालेल्या सेक्शन बी सामन्यात या भारतीय जोडीने दक्षिण आफ्रिकेला २-० (६-४, ७-५) ने पराभूत केले.

**भारताचा पदकतालिकेत पहिल्या १०मध्ये प्रवेश**

एका पदकासह भारताने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६च्या पदकतालिकेत अव्वल १० देशांमध्ये स्थान मिळवले आहे. एका कांस्यपदकासह भारताने ९वे स्थान पटकावले आहे. एकूण १३ पदकांसह ऑस्ट्रेलिया अव्वल स्थानावर आहे. विशेष म्हणजे ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत एकूण ७४ देशांनी सहभाग घेतला होता.

# 'फिडे'च्या अध्यक्षपदी आनंद; हंगामी जबाबदारी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) विद्यमान अध्यक्ष अर्कादी द्वोर्कोविच यांचे नाव युरोपीय महासंघाने (इयू) निर्बंधांच्या यादीत समाविष्ट केल्यानंतर त्यांनी तात्पुरते पदापासून दूर होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे 'फिडे'च्या नियमावलीनुसार उपाध्यक्ष आणि भारताचा माजी जगज्जेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदकडे हंगामी अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. अध्यक्षपद सांभाळणारा तो पहिला भारतीय आहे.

महासंघाचे माजी उपाध्यक्ष तसेच ग्रँडमास्टर बशार कुआतली यांनी या नियुक्तीचे स्वागत करताना 'फिडे'च्या हंगामी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल आनंदचे अभिनंदन केले. दुसरीकडे, 'फिडे'च्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत द्वोर्कोविच यांनी घेतलेल्या निर्णयाचे आनंदने कौतुक केले. महासंघाची परिषद, प्रशासकीय यंत्रणा आणि सर्व सदस्य संघटनांच्या सहकार्याने कामकाजात सातत्य राखण्यावर आपला भर राहील, असे आनंदने स्पष्ट केले.

द्वोर्कोविच यांनी उभारलेली सक्षम कार्यसंस्कृती, विकासाचा आराखडा आणि जागतिक बुद्धिबळाच्या प्रसारासाठी सुरू असलेले उपक्रम पुढे नेण्याची जबाबदारी आता संपूर्ण संघटनेची असल्याचेही आनंदने नमूद केले. आनंद २०२२ सालापासून 'फिडे'चे उपाध्यक्षपद भूषवत आहे.

रशिया-युक्रेन यांच्यात अजूनही सुरू असलेल्या युद्धाशी संबंधित काही व्यक्तींची नावे युरोपीय महासंघाच्या २१व्या निर्बंधांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात रशियन नागरिक असलेल्या द्वोर्कोविच यांचाही समावेश आहे. ''युरोपीय महासंघ आणि स्वित्झर्लंडमधील लागू असलेल्या कायद्यांनुसार माझ्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. या निर्बंधांमुळे 'फिडे'च्या दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याने मी अध्यक्षपदाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या तातडीने स्वेच्छेने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे द्वोर्कोविच यांनी निवेदनात नमूद केले.

# जपानमध्ये रंगणार एशियन गेम्स

## वेळापत्रक जाहीर




**मुंबई : प्रतिनिधी**

एशियन गेम्स २०२६ क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. एशियन गेम्स २०२६ क्रिकेट स्पर्धा जपानमधील आयाची नागोया येथे खेळली जाणार आहे. एशियन गेम्समध्ये क्रिकेट खेळाचा चौथ्यांदा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी २०१० (ग्वांगझू), २०१४ (इंचॉन) आणि २०२३ (हांगझोऊ) या स्पर्धांमध्ये क्रिकेट खेळाचा समावेश करण्यात आला होता. भारत पुरुष आणि महिला दोन्ही गटांमध्ये एशियन गेम्स क्रिकेट स्पर्धेत गतविजेता आहे. यामुळेच यंदाही भारत आणि पाकिस्तान सामन्याकडे सर्वांचे लक्ष आहे.

एशियन गेम्स २०२६ पुरुष क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे, तर अंतिम सामना १ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. या स्पर्धेत भारत, श्रीलंका, पाकिस्तान आणि बांगलादेश हे चार संघ थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळतील. तर उरलेल्या चार जागांसाठी सहा संघांमध्ये पात्रता सामने होतील. पात्रता फेरीसाठी सहा संघ दोन गटांमध्ये विभागले गेले आहेत. गट 'अ'मध्ये अफगाणिस्तान, जपान, नेपाळ आणि गट 'ब'मध्ये हाँगकाँग, मलेशिया, ओमान हे संघ आहेत.

एशियन गेम्समध्ये महिला क्रिकेट गटाचे सामने १७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर दरम्यान खेळवले जाणार आहेत. भारतीय महिला संघाला थेट उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात प्रवेश देण्यात आला आहे. भारतीय महिला संघाने २०२३ च्या हांगझोऊ येथे झालेल्या एशियन गेम्स क्रिकेट स्पर्धेत जेतेपद पटकावले होते. गतविजेता भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात यजमान जपानविरुद्ध उपांत्यपूर्व (क्वार्टरफायनल) फेरीत करणार आहे. भारत-जपान सामन्यातील विजेता संघ उपांत्य फेरीत बांगलादेश किंवा चीन यांच्याशी भिडेल. दरम्यान, इतर उपांत्यपूर्व सामन्यांमध्ये श्रीलंकेचा सामना मलेशियाशी, तर पाकिस्तानचा सामना थायलंडशी होणार आहे.

एशियन गेम्स २०२६ मध्ये आधी सहा संघांमध्ये पात्रता फेरीचे सामने खेळवले जाणार आहेत. या दोन्ही गटांमधील टॉप-२ संघांना पुढच्या फेरीत जाता येणार आहे. जिथं भारत आणि पाकिस्तानची मॅच केवळ सेमीफायनल किंवा फायनलमध्येच शक्य आहे. पण दोन्ही वेळी श्रीलंका आणि बांगलादेशने बाजी मारली, तर भारत किंवा पाकिस्तान क्वार्टरफायनलमध्येच हरतात तर हा सामना होणार नाही. दोन्ही संघांना आधी एक विजय मिळवावा लागणार आहे. यामुळे भारत-पाकिस्तान सामना होण्याची शक्यता कमी मानली जात आहे.

### भारत-अफगाणिस्तान मालिका ठरणार ऐतिहासिक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत व अफगाणिस्तान यांच्यात सप्टेंबर २०२६मध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. त्याचे संभाव्य वेळापत्रक समोर आले. मालिकेतील सर्व सामने दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम येथे १३, १५ आणि १७ सप्टेंबर रोजी होण्याची शक्यता आहे, मात्र अजून बीसीसीआय व अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डने अधिकृत घोषणा केलेली नाही. मालिकेत ऐतिहासिक नोंद होणार आहे.

भारत व अफगाणिस्तान यांच्यात होणारी मालिका ऐतिहासिक ठरेल. भारतीय भूमीवर दुसऱ्या देशाद्वारे आयोजित ही पहिली आंतरराष्ट्रीय मालिका ठरेल. यापूर्वी अफगाणिस्तानने लखनऊ, डेहराडून व ग्रेटर नोएडा येथे होम सामने खेळले असले तरी भारतीय भूमीवर भारताच्या विरुद्ध यजमान म्हणून खेळण्याची ही त्यांची पहिलीच वेळ आहे.

# ज्युदोपटू तुलिका मानचे 'नाडा'कडून तात्पुरते निलंबन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची आघाडीची ज्युदोपटू तुलिका मानवर 'नाडा'च्या नियमांचे वारंवार उल्लंघन केल्याप्रकरणी राष्ट्रीय अँटी-डोपिंग एजन्सीने तात्पुरत्या निलंबनाची (प्रोव्हिजनल सस्पेंशन) कारवाई केली आहे. लोकेशन किंवा वास्तव्याची माहिती देण्यास वारंवार अपयशी ठरल्यामुळे तिच्यावर हा कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

खेळाडूने नॅशनल अँटी-डोपिंग रूल्स २०२१ मधील कलम २.४ चे उल्लंघन केल्याचा संशय असल्याचे 'नाडा'ने खेळाडूला पाठवलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. रजिस्टर्ड टेस्टिंग पूलमध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंनी आपल्या वास्तव्याची अचूक माहिती देणे बंधनकारक असते, ज्यामध्ये ती अपयशी ठरली आहे. 'नाडा'च्या नियमांनुसार या प्रकरणाची पुढील कारवाई पार पाडली जाईल. 'नाडा'ने स्पष्ट केले की, तुलिका मान सतत रजिस्टर्ड टेस्टिंग पूलचा भाग राहिली असून, १६ डिसेंबर २०२३ आणि २२ जानेवारी २०२६ रोजी पाठवलेल्या ई-मेलद्वारे तिला 'ॲडम्स' प्रणालीवर वास्तव्याची अचूक माहिती वेळच्या वेळी सादर करण्याबाबत अवगत करण्यात आले होते. खेळाडूने दिलेल्या वेळेत आणि ठिकाणी तिचा डॉप नमुना गोळा करण्यासाठी डोपिंग कंट्रोल अधिकारी पाठवण्यात आले होते. मात्र, ठरवलेल्या दोन वेगवेगळ्या चाचणी सत्रांच्या वेळी तुलिका मान तिथे अनुपस्थित असल्याचे आढळून आले.

'नाडा'ने १० ऑक्टोबर २०२५ रोजी खेळाडूला याची माहिती दिली आणि २७ नोव्हेंबर २०२५ रोजी ही चुक अधिकृतपणे नोंदवली गेली. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी तुलिकेला याबाबत कळवण्यात आले आणि २२ मे २०२६ रोजी ही चूक अधिकृतपणे रेकॉर्ड करण्यात आली. त्यानंतर १९ जून २०२६ रोजी 'नाडा'ने या अधिसूचनेत एक दुरुस्तीपत्रक जारी केले होते. जागतिक अँटी-डोपिंग कोड आणि राष्ट्रीय अँटी-डोपिंग नियमांनुसार, १२ महिन्यांच्या कालावधीत लोकेशन न देण्याच्या किंवा चाचणी चुकवण्याच्या एकूण तीन चुका झाल्यास ते अँटी-डोपिंग नियमांचे उल्लंघन मानले जाते. तुलिका मानचे प्रकरण कलम २.४ च्या कक्षेत येत असल्याचा आरोप करत 'नाडा'ने शिस्तभंगाच्या कारवाईचा निकाल लागेपर्यंत तिला तात्पुरते निलंबित केले आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या तोंडावर भारतीय ज्युदोसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे. २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या +७८ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकणारी तुलिका मान ग्लास्गो स्पर्धेसाठी भारताची सर्वात प्रबळ पदक दावेदार मानली जात होती. भारतीय ज्युदो संघाची मोहीम ३१ जुलैपासून सुरू होणार असून हा संघ २७ जुलै रोजी ग्लास्गोसाठी रवाना होणार आहे.

# नववर्षी क्रिकेट चाहत्यांसाठी पर्वणी

## वनडे वर्ल्डकप, आयपीएलसह इतर सामन्यांचा थरार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेट चाहत्यांसाठी २०२७ हे वर्ष पर्वणी ठरणार आहे. पुढील वर्षी एका पाठोपाठ मोठ्या स्पर्धा असल्यानं क्रिकेट चाहत्यांसाठी ते वर्ष रोमांचक ठरेल. वनडे वर्ल्डकप, एशेज स्पर्धा, आशिया कप स्पर्धा होणार आहेत. वनडे वर्ल्डकप, आयपीएमुळं चाहत्यांचं मनोरंजन होईल. या सर्वांची सुरुवात भारत आणि ऑस्ट्रलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीपासून होणार आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीपासून या वर्षाची सुरुवात होईल. ऑस्ट्रेलियाचा संघ या मालिकेसाठी भारताचा दौरा करेल. दोन्ही संघांमध्ये २१ जानेवारी ते ०३ मार्च दरम्यान पाच कसोटी सामने होतील.

- पहिली कसोटी- २१-२५ जानेवारी, नागपूर
- दुसरी कसोटी- २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी, चेन्नई
- तिसरी कसोटी- ११-१५ फेब्रुवारी, गुवाहाटी
- चौथी कसोटी- १९-२३ फेब्रुवारी, रांची
- पाचवी कसोटी- २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च, अहमदाबाद

आयपीएलचा २०२७ चा हंगाम कधी सुरु होणार यासंदर्भात अधिकृत वेळापत्रक जारी करण्यात आलेलं नाही. मात्र, आयपीएल १४ मार्च ते ३० मेदरम्यान होईल. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२७ची फायनल ९ ते १३ जूनदरम्यान लंडनच्या केनिंग्टन ओवलमध्ये खेळवली जाईल. आशिया कप २०२७चे वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आले नाही, मात्र आगामी वनडे वर्ल्डकपच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर ही स्पर्धा वनडे फॉरमॅटमध्ये होईल. १८ जून ते ४ जुलैदरम्यान ही स्पर्धा होऊ शकते, अशी शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने वनडे वर्ल्ड कपचं अधिकृत वेळापत्रक जाहीर केले नाही. मात्र, दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामीबिया यांच्याकडून वनडे वर्ल्डकपचं आयोजन केलं जाणार आहे. मात्र, ४ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबरदरम्यान स्पर्धा होणार असल्याची अपडेट आहे.

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ऐतिहासिक एशेज मालिकेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. २०२७च्या एशेज मालिकेतील पाच कसोटी सामने १८ जून ते २ ऑगस्टदरम्यान खेळवले जातील. ही मालिका इंग्लंडमध्ये होईल.

- पहिली कसोटी- १८-२२ जून, नॉटिंघम
- दुसरी कसोटी- ३० जून ते ०४ जुलै, लॉर्ड्स
- तिसरी कसोटी- ०८-१२ जुलै, बर्मिंघम
- चौथी कसोटी- २१-२५ जुलै, साउथॅम्पटन
- पाचवी कसोटी- २९ जुलै ते ०२ ऑगस्ट, लंडन, द ओवल

# अनाहत सिंग जागतिक ज्युनियर स्क्वॅश चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत

**ओंटारियो (कॅनडा) : वृत्तसंस्था**

भारताची अव्वल मानांकित स्क्वॅश खेळाडू अनाहत सिंगने जागतिक ज्युनियर स्क्वॅश चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचून इतिहास रचला आहे. २००५मध्ये जोशना चिनप्पानंतर या प्रतिष्ठित स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत, दिल्लीच्या अनाहतने इजिप्तच्या बार्ब समेहचा ११-३, ८-११, ११-४, ११-६ असा पराभव करून विजेतेपदाच्या सामन्यात प्रवेश केला.



जागतिक क्रमवारीत २० व्या स्थानावर असलेल्या अनाहतने गेल्या वर्षी याच स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. आता ती जागतिक ज्युनियर स्क्वॅश चॅम्पियन बनण्यापासून फक्त एक विजय दूर आहे. जर तिने अंतिम सामना जिंकला, तर ती असे करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरेल. विजयानंतर अनाहत म्हणाली, "मी खूप आनंदी आहे. काही महिन्यांपूर्वी, मी ब्रिटिश ज्युनियर ओपनमध्ये बार्बविरुद्ध खेळले होते आणि तो सामनाही खूप अटीतटीचा झाला होता. मला माहित होते की यावेळी जिंकण्यासाठी मला माझा सर्वोत्तम खेळ करावा लागेल."

ती पुढे म्हणाली, "काल मी माझा सर्वोत्तम खेळ करू शकले नाही, त्यामुळे स्वतःला सिद्ध करणे महत्त्वाचे होते. मी जागतिक ज्युनियर चॅम्पियनशिपमध्ये चार वेळा खेळले आहे. मी उपांत्यपूर्व फेरी आणि नंतर उपांत्य फेरी गाठली, पण यावेळी अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे माझे आई-वडील आणि प्रशिक्षक खूप आनंदी आहेत. पण, माझे ध्येय अजून पूर्ण झालेले नाही." अनाहतचा सामना आता अंतिम फेरीत इजिप्तच्या दुसऱ्या मानांकित रुकाया सालेमशी होईल. भारतीय स्क्वॅशच्या इतिहासात एक नवीन अध्याय लिहिण्यासाठी अनाहतला आता केवळ एका विजयाची गरज आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com